दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-३७ | शनिवार दि.२५ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### न्यायालयाचे ताशेरे, लोकशाहीचे भान आणि बदलत्या समाजाची हाक..!

देशातील लोकशाही व्यवस्थेचा पाया केवळ निवडणुका आणि सत्तांतरावर उभा नाही, तर तो संविधान, न्यायव्यवस्था आणि सत्ताधाऱ्यांच्या उत्तरदायित्वावरही तितकाच अवलंबून आहे. अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने आय-पॅक प्रकरणात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या हस्तक्षेपाबाबत व्यक्त केलेली तीव्र नाराजी ही केवळ एका व्यक्तीवर केलेली टीका नसून, सत्तेच्या मर्यादा काय असाव्यात याची ठळक आठवण आहे.

# खत दरवाढीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात सध्या खतांच्या किमतीत झालेल्या प्रचंड वाढीमुळे ग्रामीण भागातील शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी सुमारे १००० ते ११०० रुपयांना मिळणारी खतांची एक गोणी आता थेट १८०० ते २००० रुपयांच्या घरात पोहोचली आहे. हंगामाच्या तोंडावर झालेल्या या दरवाढीमुळे शेतीचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडले असून, सामान्य शेतकऱ्यांसाठी शेती करणे परवडणारे राहिलेले नाही.**



शेतकऱ्यांच्या मते, मजुरी, बियाणे आणि इंधन खर्च आधीच वाढलेला असताना खतांच्या दरवाढीने संकट अधिकच गडद झाले आहे. ''उत्पन्नाच्या तुलनेत खर्च दुप्पट वाढला आहे. अशा परिस्थितीत शेती करावी की नाही, हा प्रश्न निर्माण झाला आहे,'' अशी प्रतिक्रिया अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. विशेषतः खरीप हंगाम जवळ येत असताना खतांच्या दरात झालेली ४०० ते ५०० रुपयांची अचानक वाढ शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवणारी ठरली आहे. मार्चनंतर खत कंपन्या आणि शासकीय यंत्रणांच्या निर्णयामुळे ही दरवाढ लागू झाल्याचे सांगितले जात असून, त्याविरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. या दरवाढीचा फटका केवळ शेतकऱ्यांनाच नाही, तर ग्रामीण भागातील लहान कृषी सेवा केंद्र चालकांनाही बसत आहे. खतांचे ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### निवडणुकीनंतरही इंधन दरवाढ नाही

दिल्ली : पश्चिम बंगालच्या निवडणुकीनंतर पेट्रोल, डिझेलच्या दरात २५ ते २८ रुपयांची वाढ होणार नसून, याबाबतचे वृत्त निराधार आणि दिशाभूल करणारे असल्याचे स्पष्टीकरण पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने गुरुवारी दिले. अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धामुळे कच्च्या तेलाचे भाव १०० डॉलर प्रतिबॅरलवर गेले आहेत. दीर्घकाळ कच्च्या तेलाचे दर शंभर डॉलरपार राहिल्याने भाववाढ होण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. पश्चिम बंगालसह काही राज्यांच्या निवडणुका पार पडल्यानंतर भाववाढ केली जाईल, असे वृत्त माध्यमांनी दिले. नागरिकांमध्ये भीती पसरविण्यासाठी असे वृत्त दिले जात असल्याचे सरकारकडून सांगण्यात आले. भारत गरजेच्या ८० टक्क्यांहून अधिक तेल आयात करतो. आकडेवारीनुसार मार्च आणि एप्रिलमध्ये भारताने कच्च्या तेलाची आयात १२ ते १५ टक्क्यांनी कमी केली असूनही वाढलेल्या किमतींमुळे भारताचे आयात बिल दररोज १९० ते २१० दशलक्ष डॉलर्सनी वाढले आहे.

### संजय निरुपम यांच्या गाडीवर मनसेची दगडफेक

मुंबई : रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईतील अमराठी रिक्षा आणि टॅक्सीचालक संतापले आहेत. आज शिवसेना नेते संजय निरुपम यांनी दहिसर येथील गणपत पाटील नगरमध्ये मराठी भाषेच्या कडक सक्तीबाबत ऑटोचालकांशी संवाद साधला. यावेळी मनसेचे नेते नयन कदम आणि कुणाल मईणकर कार्यकर्त्यांसोबत येथे पोहोचले होते. यावेळी मनसेकडून घोषणाबाजीही करण्यात आली. तसेच संजय निरुपम यांनी मराठीला विरोध केला तर त्यांना धडा शिकवला जाईल असे विधान केले. मुंबईतील दहिसरमध्ये बोलताना संजय निरुपम यांनी म्हटले की, आमच्या पक्षाची आणि एकनाथ शिंदे यांची सुरूवातीपासून ही भूमिका आहे की, महाराष्ट्रात जे लोक राहतात, त्यांनी मराठीत बोललं पाहिजे, याबाबत कुणाला शंका नाही. महाराष्ट्रात मराठीचा सन्मान व्हायला पाहिजे याबाबतही कुणाचा आक्षेप नाही. मात्र मराठी भाषेच्या नावाखाली जोर जबरदस्ती करणे, गुंडगिरी करणे, सक्ती करणे, एखाद्याला धमकावणे हे चुकीचे आहे आणि आमचा याला विरोध आहे.

### आधुनिक शेळीपालनातून समृद्धीची नवी पहाट

पुणे : शेळी व मेंढीपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जात असून कमी गुंतवणुकीत अधिक नफा देणारा व्यवसाय म्हणून त्याची ओळख 'एटीएम'प्रमाणे निर्माण झाली आहे. शेळीच्या मांसाला वाढती मागणी आणि चांगले दर मिळत असल्याने तरुणांचा या व्यवसायाकडे मोठ्या प्रमाणात कल वाढत आहे. पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना' या व्यवसायाला मोठा आधार देत आहे. या योजनेत शेळी-मेंढीपालनासाठी आर्थिक अनुदान, सुधारित जाती, आधुनिक तंत्रज्ञान आणि सुसज्ज गोठ्यांसाठी मदत दिली जाते. आधुनिक 'सेमी-स्टॉल फीडिंग' पद्धतीमुळे हा व्यवसाय अधिक फायदेशीर ठरत असून महिलांनाही घरबसल्या उत्पन्नाचे साधन मिळत आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२६.५० क्विंटल | १,७०८ | २,६५० | २,२९४ |
| ज्वारी/हायब्रिड: १०६.५० क्विंटल | १,६६० | ४,००० | २,४३७ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ६.०० क्विंटल | ७,४०१ | ७,४०१ | ७,४०१ |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ८३.०० क्विंटल | १,८२७ | २,४३५ | २,२२८ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १४७.५० क्विंटल | ५,५७५ | ५,६५१ | ५,६१३ |
| हरभरा: २५.०० क्विंटल | ५,१७६ | ५,१७६ | ५,१७६ |

# आता खासदारांपाठोपाठ ५० आमदारही फुटणार; 'आप'ला पुन्हा धक्का बसणार?

दिल्ली । वृत्तसंस्था

**राज्यसभेतील खासदारांनंतर आता आम आदमी पक्षात मोठी फूट पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आम आदमी पक्ष चे तब्बल ५० आमदार भाजपमध्ये जाण्याच्या तयारीत असल्याचा दावा करण्यात आला असून, यामुळे पंजाबच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.**

हा दावा अमरिंदर सिंग राजा वारिंग यांनी केला आहे. माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, ''सध्या खासदार फुटले आहेत, पण पुढे ५० आमदारही भारतीय जनता पक्ष मध्ये प्रवेश करू शकतात. पक्षाने याकडे गांभीर्याने पाहायला हवे.'' पंजाब विधानसभा निवडणुकीत २०२२ मध्ये 'आप'ने ११७ पैकी ९२ जागा जिंकत सत्ता मिळवली होती. मात्र आता २०२७ च्या निवडणुकांपूर्वीच पक्षात अस्थिरता निर्माण होत असल्याचे संकेत मिळत आहेत. दरम्यान, 'आप'चे नेते संजय सिंह यांनी भाजपवर ''ऑपरेशन लोटस'' चालवण्याचा आरोप केला आहे. ''देशभरात आमचे आमदार आणि खासदार फोडण्याचा प्रयत्न सुरू आहे,'' असे ते म्हणाले. या घडामोडींमुळे पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. दरम्यान, या दाव्यांमुळे पंजाबमधील 'आप' सरकार अस्थिर होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

# पंकजा मुंडेंना मुख्यमंत्री करा...!

## संजय राऊत यांच्या वक्तव्याने राजकारण तापलं

मुंबई । प्रतिनिधी

**नारीशक्ती वंदन विधेयक लोकसभेत मंजूर न झाल्यानंतर राज्यातील राजकारण पुन्हा तापले आहे. याच मुद्द्यावरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधत, ''महिलांबद्दल खरंच आस्था असेल तर पंकजा मुंडे यांना मुख्यमंत्री करा,'' असे विधान केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.**

माध्यमांशी संवाद साधताना राऊत म्हणाले, ''नारीशक्ती वंदन हे केवळ ढोंग आहे. महिलांना खऱ्या अर्थाने सत्तेत स्थान द्यायचं असेल तर मुख्यमंत्री आणि पंतप्रधान पदावर महिला नेत्यांना



संधी द्यावी.'' त्यांनी केंद्रातील भाजप सरकारवरही टीका करत, ''देशाची स्थिती बिघडली आहे,'' असा आरोप केला. दरम्यान, भाजपकडून या विधेयकाच्या समर्थनार्थ मुंबई आणि पुण्यात जनआक्रोश मोर्चे काढण्यात आले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना राऊतांनी सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह ▶▶ पान २ वर

## आ.गायकवाडांच्या विधानाशी शिवसेनेचा संबंध नाही

मुंबई । प्रतिनिधी

कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता या पुस्तकाच्या शीर्षकावरुन प्रकाशक प्रशांत आंबी यांना शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी देणारे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. कारण, या प्रकरणात शिवसेनेची पहिली प्रतिक्रिया आली असून पक्षाने संजय गायकवाड यांची पाठराखण करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. संजय गायकवाड यांच्या अशा वक्तव्यांमुळे शिवसेना आणि एकनाथ शिंदे यांची बदनामी होते, असे वक्तव्य शिवसेनेचे प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी केले आहे.

संजय गायकवाडची जी ऑडिओ क्लीप फिरतेय, त्याची सत्यता माहिती नाही. पण संजय गायकवाडांच्या वक्तव्याशी आणि विचाराशी पक्षाचा संबंध नाही, हे त्यांचं वैयक्तिक मत, पक्ष त्याचे समर्थन करत नाही, असे प्रकाश महाजन यांनी स्पष्टपणे सांगितले. ▶▶ पान २ वर

# पंजाब मध्ये आप भाजपमध्ये विलीन

चंदीगड । प्रतिनिधी

**आम आदमी पक्षाच्या सात राज्यसभा खासदारांनी भाजपमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, पक्षाचे नेते संजय सिंह यांनी या खासदारांवर तीव्र टीका करत त्यांना ''पंजाबचे विश्वासघातकी'' असे संबोधले आहे. आप कडून याला विरोध करताना त्या सात खासदारावर मोठे आरोप लावण्यात आले असले तरी पंजाब मधील आम आदमी पक्ष भाजपमध्ये विलीन झाला यावर आपने त्या खासदारावर मोठ्या प्रमाणात आरोप केले आहेत.**

पत्रकार परिषदेत बोलताना सिंह यांनी भाजपवर गंभीर आरोप करत ''ऑपरेशन लोटस''द्वारे पंजाबमधील भगवंत मान यांच्या सरकारचे कामकाज खिळखिळे करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे म्हटले. ''भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी पंजाबमधील चांगल्या कामांना अडथळा आणण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. पंजाबच्या जनतेने या सातही खासदारांची नावे लक्षात ठेवावीत, त्यांना जनता कधीच माफ करणार नाही,'' असा इशाराही त्यांनी दिला. या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री भगवंत मान यांनीही भाजपमध्ये जाणाऱ्या खासदारांवर निशाणा साधत ''हे खासदार पंजाबचे प्रतिनिधित्व करत नाहीत, ते राज्याचे विश्वासघातकी आहेत,'' असे स्पष्ट केले. तसेच भाजपमध्ये जाऊनही त्यांना कोणताही फायदा होणार नाही, असेही त्यांनी म्हटले. दरम्यान, आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी 'एक्स'वर प्रतिक्रिया देताना भाजपवर टीका केली. ''भाजपने पुन्हा एकदा पंजाबकरांशी विश्वासघात केला,'' असा आरोप त्यांनी केला. ▶▶ पान २ वर

# शिवीगाळ प्रकरणी संजय गायकवाडांची दिलगिरी!

मुंबई । प्रतिनिधी

**शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या वादावरून निर्माण झालेल्या प्रकरणात शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी अखेर दिलगिरी व्यक्त केली आहे. प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवरून शिवीगाळ केल्याबद्दल त्यांनी माफी मागितली असली, तरी छत्रपती शिवाजी महाराज यांचा सन्मानपूर्वक उल्लेख व्हावा, या भूमिकेवर ते ठाम असल्याचे स्पष्ट केले.**

या प्रकरणात गायकवाड यांनी पुस्तकाचे कव्हर पाहूनच संताप व्यक्त करत आंबी यांना




धमकी दिल्याचा आरोप होता. या घटनेनंतर सोशल मीडियावर त्यांच्यावर तीव्र टीका झाली, तसेच राजकीय स्तरावरही सावध प्रतिक्रिया उमटल्या. आंबी यांनी पोलिसांत तक्रार देण्याचा ▶▶ पान २ वर

# विधानपरिषद निवडणूक; हालचालींना वेग

मुंबई । प्रतिनिधी

बारामती, राहुरी पोटनिवडणुकीचे मतदान आटोपले असताना आता विधान परिषदेच्या १० जागांसाठीच्या निवडणूक हालचालींना वेग आला आहे. भाजपच्या कोअर कमिटीने एकास पाच फॉर्म्युल्याने केंद्रीय भाजपकडे नावे पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारीला काँग्रेसने आधीच समर्थन दिलेले असताना खा. सुप्रिया सुळे यांनीही ठाकरे यांना गळ घातली आहे. आमदारकीसाठी एक



नाव ठरविताना राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाची मोठीच कसरत होणार आहे.

केंद्रीय भाजपशी चर्चा करून नावे अंतिम करण्याचा अधिकार 'वर्षा'वरील बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांना देण्यात आला. डॉ. राजीव पोतदार, संजय केणेकर, सुनील कर्जतकर, माजी आमदार प्रज्ञा सातव, राजा राऊत, प्रशांत परिचारक, राम सातपुते, सुरेश हळवणकर, निलय नाईक, प्रकाश पाटील देवसरकर तसेच माजी मंत्री अनंतराव देशमुख. याशिवाय गणेश हाके, नीता केळकर, राजेश पांडे, डॉ. आरती फुसाटे, अतुल काळसेकर, माधव भंडारी, माधवी नाईक, विजय चौधरी, लक्ष्मण सावजी, सुरेश बनकर, अर्चना पाटील चाकूरकर आणि दयाशंकर तिवारी. ▶▶ पान २ वर

# चमत्कार सिद्ध करा, ८० लाख मिळवा...!

## धीरेंद्र शास्त्रींना 'अंनिस'चे आव्हान

नागपूर । वृत्तसंस्था

अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांना पुन्हा एकदा जाहीर आव्हान दिले आहे. शास्त्री यांनी समितीने ठरवून दिलेल्या अटीनुसार त्यांच्याकडे असलेली दिव्यशक्ती सिद्ध करून दाखवल्यास त्यांना ८० लाख रुपये दिले जातील, अन्यथा



अनामत रक्कमही जप्त होईल, अशी घोषणा अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक संघटक प्रा. श्याम मानव यांनी पत्रपरिषदेत केली. अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आज आयोजित बुवा तेथे बाया व्याख्यानाच्या निमित्ताने ते बोलत होते.

प्रा. मानव म्हणाले, धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी त्यांच्यातील दिव्यशक्तीद्वारे 'अंनिस'ने आयोजित केलेल्या दोन मुख्य चाचण्या ▶▶ पान २ वर

# सूर्य कोपला पारा ४५ अंशावर महाराष्ट्र तापला!

मुंबई । प्रतिनिधी

दिवसेंदिवस राज्यात तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानाचा मोठा त्रास लोकांना सहन करावा लागत आहे. राज्यातील तापमानाचा पारा ४५ अंशावर गेला आहे. अकोल्यात ज विक्रमी ४५ अंश तापमानाची नोंद झाली आहे. त्याचबरोबर राज्यातील अनेक शहरात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. तापमानात वाझ झाल्यामुळं अनेक जिल्ह्यातील शाळांच्या वेळामध्ये देखील बदल करण्यात आले आहेत. शाळा सकाळच्या सत्रात भरवण्यात येत आहेत. कोणत्या जिल्ह्यात किती तापमानाची नोंद



झाली राज्यातील महत्त्वाच्या शहरांमधील तापमानअकोला - ४५अमरावती - ४४.८चंद्रपूर - ४४गडचिरोली - ४४यवतमाळ - ४४वर्धा - ४४.४नागपूर - ४४.४ब्रह्मपुरी - ४४.७गोंडिया - ४४.२वाशिम - ४८.६बुलढाणा - ४८.५ माथेरान - ४८.६जालना - ४८.६बीड - ४८.५उदगीर - ४८.४मालेगाव - ४८.६नाशिक - ४८.६ संभाजीनगर - ४८.६धाराशिव - ४८.४सातारा - ४८.९रत्नागिरी - ४८.३नवी मुंबई - ४८.२परभणी - ४८पुणे - ९.९सांगली - ९.८मुंबई - ९.६गोंदिया जिल्ह्याचे तापमान ४३.०२ अंश सेल्सिअस, कडाक्याच्या उन्हाने गोंदिया जिल्हावासीय हैराणगोंदिया जिल्ह्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत चालला असून, आज तापमानाने ४३.०२ अंश सेल्सिअस इतका उच्चांक गाठला आहे. दिवसेंदिवस उन्हाचा तडाका वाढत असून नागरिकांनी आवश्यक काम असल्यावरच घराबाहेर पडावे व उन्हापासून बचाव करण्याकरिता रुमाल, गमजाचा वापर करावा. तसेच भरपूर प्रमाणात शीतपेय ग्रहण करावे असे आवाहन गोंदिया जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात २४ आणि २५ एप्रिल रोजी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यतामध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात २४ आणि २५ एप्रिल रोजी विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर, विदर्भात २८ एप्रिल रोजी वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. ▶▶ पान २ वर

### उष्णतेचा प्रभाव कायम

महाराष्ट्रातील अनेक भागात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता असून उष्णतेमुळे नागरिकांना त्रास होऊ शकतो. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात उकाडा अधिक जाणवेल, असा अंदाज केंद्रीय हवामान विभागाने वर्तवला आहे.

### शेतकऱ्यांसाठी सूचना

हवामान विभागाने शेतकऱ्यांनाही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार, पिकांना सकाळी किंवा संध्याकाळी हलके पाणी द्यावे, जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी मल्चिंगचा वापर करावा. नव्या लागवडीवर सावलीसाठी जाळी वापरावे, असे सूचवण्यात आले आहे.

## अग्रलेख

# न्यायालयाचे ताशेरे, लोकशाहीचे भान आणि बदलत्या समाजाची हाक..!

देशातील लोकशाही व्यवस्थेचा पाया केवळ निवडणुका आणि सत्तांतरावर उभा नाही, तर तो संविधान, न्यायव्यवस्था आणि सत्ताधाऱ्यांच्या उत्तरदायित्वावरही तितकाच अवलंबून आहे. अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने आय-पॅक प्रकरणात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या हस्तक्षेपाबाबत व्यक्त केलेली तीव्र नाराजी ही केवळ एका व्यक्तीवर केलेली टीका नसून, सत्तेच्या मर्यादा काय असाव्यात याची ठळक आठवण आहे.

मुख्यमंत्री हे राज्यघटनेने दिलेले एक महत्त्वपूर्ण पद आहे. या पदावर असणाऱ्या व्यक्तीने कायद्याचा सन्मान राखणे आणि चौकशी यंत्रणांना स्वतंत्रपणे काम करू देणे अपेक्षित असते. परंतु, जेव्हा सत्ताधारी व्यक्ती स्वतःच तपास प्रक्रियेत हस्तक्षेप करते किंवा त्या यंत्रणेलाच आव्हान देते, तेव्हा लोकशाहीची समतोल रचना डळमळीत होण्याचा धोका निर्माण होतो. सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली नाराजी याच संदर्भात अत्यंत महत्त्वाची आहे. ''कायदा सर्वांसाठी समान आहे'' ही मूलभूत संकल्पना केवळ तत्त्वज्ञानापुरती मर्यादित राहू नये, तर ती आचरणातही दिसली पाहिजे.

लोकशाहीत विरोध हा अपरिहार्य घटक आहे. सत्ताधाऱ्यांवर टीका होणे, त्यांच्या निर्णयांना आव्हान दिले जाणे हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. मात्र, जर सत्ताधारी प्रत्येक विरोध वैयक्तिक पातळीवर घेत असतील आणि प्रशासनात हस्तक्षेप करत असतील, तर ते आरोग्यदायी लोकशाहीचे लक्षण नाही. न्यायालयाचे वारंवार होणारे ताशेरे हे अशाच प्रवृत्तीचे निदर्शक आहेत.दुसरीकडे, सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली शबरीमला मंदिर प्रकरणाची सुनावणी ही भारतीय समाजातील बदलत्या मूल्यांची जाणीव करून देणारी आहे. महिलांना मंदिर प्रवेश नाकारण्याची परंपरा कितीही प्राचीन असली तरी, आधुनिक काळात ती घटनात्मक मूल्यांशी सुसंगत राहते का, हा मूलभूत प्रश्न आहे. न्यायालयाने उपस्थित केलेला ''सर्वांसाठी समानता'' हा मुद्दा केवळ धार्मिक स्थळांपुरता मर्यादित नसून, तो समाजातील व्यापक समानतेच्या संकल्पनेशी जोडलेला आहे. महिलांना एका बाजूला राजकारणात आरक्षण देण्याचा विचार केला जातो, त्यांच्या सक्षमीकरणासाठी योजना राबवल्या जातात, आणि दुसऱ्या बाजूला धार्मिक स्थळांमध्ये प्रवेश नाकारला जातो, ही विसंगती स्पष्टपणे जाणवते. समाजाच्या एका घटकाला दुय्यम स्थान देणाऱ्या परंपरा टिकवून ठेवणे हे आजच्या काळात योग्य ठरू शकत नाही. न्यायमूर्तींनी व्यक्त केलेली चिंता देखील महत्त्वाची आहे. जर धार्मिक संस्था स्वतःहून बदल स्वीकारणार नसतील, तर भविष्यात त्यांना कठोर कायदेशीर हस्तक्षेपाला सामोरे जावे लागू शकते. समाजातील सर्व घटकांना समान अधिकार मिळवून देणे ही केवळ सरकारची नव्हे, तर समाजाचीही सामूहिक जबाबदारी आहे. सरन्यायाधीशांनी सरकारला दिलेला सूचक सल्ला जनतेच्या इच्छेनुसार योग्य निर्णय घेण्याचा हा लोकशाहीच्या मूलभूत तत्वांना अधोरेखित करणारा आहे. सरकार हे जनतेचे प्रतिनिधित्व करते, त्यामुळे सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी त्याने सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. एकूणच, न्यायालयाच्या ताशेऱ्यांमधून दोन स्पष्ट संदेश समोर येतात. एक म्हणजे सत्ताधाऱ्यांनी आपल्या अधिकारांच्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत, आणि दुसरे म्हणजे समाजाने बदलत्या काळानुसार आपल्या परंपरांचे पुनर्मूल्यांकन केले पाहिजे. लोकशाही केवळ सत्तेच्या वापराने नव्हे, तर संयम, समता आणि न्याय यांच्या मूल्यांनी टिकून राहते. आणि हीच मूल्ये जपण्याची जबाबदारी आज प्रत्येक सत्ताधाऱ्यावर आणि समाजातील प्रत्येक घटकावर समानपणे आहे.

# आष्टीची कन्या शाळा मी व रेडेकर गुरुजींनी मंजूर करुन आणल्यामुळे येथे आज हजारो मुली घडल्या-माजी आ. साहेबराव दरेकर

## तालुक्यातील शिक्षक चांगले असून त्यांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्यावे-देविदास धस

आष्टी । प्रतिनिधी

**शिक्षण क्षेत्रात अनेक दशके निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि विद्यार्थीकेंद्री दृष्टीकोनातून कार्य करून समाजमनावर ठसा उमटवणारे पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, जि. बीड येथील ज्येष्ठ आदर्श शिक्षक जगताप विठ्ठल वामनराव (प्रा.प.) व श्रीम. तरटे लतिका भानुदास (प्रा.प.) यांचा सेवापुर्ती सत्कार सोहळा अत्यंत उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. त्यांच्या दीर्घ शैक्षणिक प्रवासाचा गौरव करण्यासाठी आयोजित हा सोहळा आष्टी शहरासाठी अभिमानाची ठरला आहे.**

गुरुवार दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लक्ष्मी लॉन मंगल कार्यालय, खडकत रोड, आष्टी येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. निवृत्ती महाराज बोडखे (दादा) हे होते तर प्रमुख उपस्थिती माजी आ. साहेबराव (नाना) दरेकर, मा. जि. प. सदस्य देविदास (आबा) धस, मा. जि. प. सदस्य सतिष (आबा) शिंदे, मा. सभापती बद्रीनाथ जगताप, मा. नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, ह.भ.प. कोकणे महाराज, जनार्धन कासले, पी. वाय. काळे, संपत धोंडे, तान्हाजी भगत, चंद्रकांत शिंदे, पोपटराव खाडे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार शरद तळेकर, पत्रकार शरद रेडेकर, पत्रकार आण्णासाहेब साबळे, प्रा. सय्यद अल्लाउद्दीन, प्राचार्य सुर्यकांत मोकासे, प्राचार्य सोपानराव निंबोरे, लक्ष्मण रेडेकर, डॉ. नदीम शेख, कल्याण काकडे, प्रा. दत्तात्रय नरसाळे, डॉ. युवराज तरटे, सरपंच आकाश तरटे, सरपंच बलभिम वाघमोडे, मनोरंजन धस, सुरेश पवार, श्रीमती सुनिता उगले, चेअरमन मारुती पठाडे, अशोक लटपटे, महेशकुमार शिंदे, तुळशीदास कोकणे, आबासाहेब खताळ, प्राचार्य सुभाष तरटे, दादा जगताप, तायराम गळगटे, श्रीमती मथुराबाई तरटे, श्रीम. सुजाता झगडे, श्रीमती जयश्री धोंडे, श्रीमती उज्वला धोत्रे, श्रीमती अनिता लांबडे यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. सुरुवातीला अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी हार्मोनियन वादक सतिश दळवी व तबला वादक श्रीम. सुनिता पोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या गीतमंच चमूने इशस्तवन व स्वागत गीत सादर केले. याप्रसंगी अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचा शाल, पुस्तक व पुष्पगुच्छ देवून पीएम श्री कन्या प्रशालेच्या वतिने सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक दत्तात्रय गाडेकर यांनी





करुन सत्कारमूर्ती विठ्ठल जगताप व श्रीम. लतिका तरटे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा लेखा-जोका मांडला. तद्नंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते विठ्ठल जगताप व श्रीम. लतिका तरटे यांचा उभा पोषाख, शाल, श्रीफळ, हार, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह, फेटा परिधान करुन यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना माजी आ. साहेबराव दरेकर यांनी सांगितले की, शिक्षकांनी सेवापूर्ती कार्यक्रमासाठी जास्तीचा खर्च न करता आपण ज्या शाळेत शैक्षणिक कामकाज करतो त्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर खर्च करावा, जेणेकरुन ते पुढे अधिकारी झाल्यावर तुमची जाण ठेवतील, नाव घेतील. तसेच ते पुढे म्हणाले की, आष्टी ला कन्या शाळा नव्हती, गेवराई येथे त्या काळात कन्या शाळा मंजुर झालेली होती पण तेथे जागा उपलब्ध होत नव्हती, तेंव्हा मी व विठ्ठलराव रेडेकर गुरुजींनी प्रयत्न करुन आष्टी येथे जागा उपलब्ध करुन कन्या शाळा आष्टी येथे मंजूर करुन आणली. त्यामुळे आज हजारो मुली या शाळेत घडल्या गेल्या, अधिकारी झाल्या. शेवटी सत्कारमूर्तींना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मा. जि. प. सदस्य देविदास आबा धस यांनी सांगितले की, तालुक्यातील शिक्षक चांगले असून त्यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक दर्जेदार शिक्षण दिले पाहिजे. जगताप व श्रीम. तरटे यांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देवून प्रेम मंदिर एक आदर्श मंदिर आहे. सेवापूर्ती झाल्यामुळे तेथे आपण जावे व मंदिर पहावे असा धार्मिक सल्लाही शेवटी त्यांनी दिला. याप्रसंगी मा. जि. प. सदस्य सतिश आबा शिंदे, ह.भ.प. कोकणे महाराज, मा. सभापती बद्रीनाथ जगताप, मनोरंजन धस, श्रीम. आशाताई शिंदे, डॉ. नदिम शेख यांनी आपले विचार मांडले व विठ्ठल जगताप व श्रीम. लतिका तरटे यांना पुढील वाटचालीस, भावी आयुष्यासाठी मनपूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच विठ्ठल जगताप व श्रीम. लतिका तरटे यांनी आपली मनोगते व्यक्त करुन सेवाकाळात ज्यांनी-ज्यांनी मदत केली त्यांचे आभार व्यक्त करुन कार्यक्रमास उपस्थितीत राहिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. अध्यक्षीय मनोगतात ह.भ.प. निवृत्ती महाराज बोडखे दादांनी सांगितले की, या दोनही शिक्षकांनी आपल्या कार्यकाळात चांगले काम करुन विद्यार्थ्यांना चांगले संस्कार दिले. याचीच पावती त्यांना आज या ठिकाणी पहावयास मिळत आहे. पुढील काळात त्यांनी धार्मिक कार्य करत जनसेवा करावी. दोघांनाही भावी निरोगी आयुष्यासाठी आर्शिवाद देवून अध्यक्षीय समारोप केला. व्यासपिठासमोर आकर्षक व सुबक रांगोळी काढल्याबद्दल श्रीम. कोमल थेटे तसेच सतिश दळवी (हार्मोनियम) श्रीम. सुनिता पोकळे (तबला) व गीतमंच चमूतील विद्यार्थीनींचा तसेच उत्कृष्ट सुत्रसंचलन केल्याबद्दल आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांचा यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, कला, क्रीडा, व्यापारी, शेतकरी, अधिकारी-पदाधिकारी, टाकळसिंग व डोईठाण येथील ग्रामस्थ, अनेक शिक्षक-शिक्षिका, महिला भगिनीं, नातेवाईक, मित्र परिवार, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी केले तर आभार राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड यांनी मानले. हा सत्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशालेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, केंद्रीय मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद आष्टी नं. १ यांनी कठोर परिश्रम घेतले. शेवटी सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. सायंकाळी ५ वाजता सत्कारमूर्तींना बॅंन्ड पथकासह वाजत-गाजत घरपोहच निरोप देण्यात आला.

# पनीरच्या नावाखाली ॲनालॉगचा वापर आढळल्यास आता थेट कारवाई

जालना । प्रतिनिधी

**हॉटेलमध्ये चवीने पनीर टिक्का किंवा पनीर बटर मसालाच्या डिशमध्ये तुम्ही नक्की काय खाताय, याचा आता गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. पनीरच्या नावाखाली स्वस्त दरातील चीज ॲनालॉगचा वापर करून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या रेस्टॉरंट आणि हॉटेल चालकांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाने आता कडक पावले उचलली आहेत. ॲनालॉगचा वापर आढळल्यास थेट कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त श्रीधर डुबे पाटील यांनी दिले आहेत.**

शाकाहारी खवय्यांसाठी पनीर हा प्रथिनांचा मुख्य स्रोत मानला जातो. मात्र, वाढत्या नफेखोरीसाठी काही व्यावसायिक दुधापासून बनवलेल्या अस्सल पनीरऐवजी खाद्यतेल, स्टार्च आणि इमल्सिफायर वापरून तयार केलेले ॲनालॉग ग्राहकांच्या ताटात वाढत आहेत. हे दिसायला पनीरसारखेच असले तरी त्याचे पोषणमूल्य दुधाच्या पनीरपेक्षा पूर्णपणे वेगळे असते. अनेक हॉटेल्समध्ये ग्राहकांना कोणतीही पूर्वकल्पना न देता हे स्वस्त पर्याय वापरले जात आहेत. यावर प्रतिबंध लावण्यासाठी प्रशासनाने आता नवे नियम लागू केले आहेत. यामध्ये जर हॉटेलमध्ये 'ॲनालॉग' वापरले जात असेल, तर त्याचा स्पष्ट उल्लेख मेन्यूकार्ड किंवा डिस्प्ले बोर्डवर करावा लागेल. विक्री बिलावर केवळ पनीर न लिहिता डेअरी ॲनालॉग असा स्पष्ट उल्लेख करणे आता बंधनकारक आहे. सर्व अन्न व्यावसायिकांनी त्यांच्या ऑनलाइन परवाना अर्जामध्ये स्वतःचा ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक तात्काळ अपडेट करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. नागरिकांनी पॅक बंद पनीर खरेदी करताना त्यावरील घटक नीट वाचून खात्री करा. सुटे पनीर घेताना ते शुद्ध दुधाचे असल्याची खात्री करा आणि संशय आल्यास पक्के बिल मागायला विसरू नका. ऑर्डर देण्यापूर्वी हॉटेलमध्ये पनीर आणि ॲनालॉग असे स्वतंत्र पर्याय आहेत का, याची विचारणा करावी. जर आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आले, तर ग्राहकांनी तात्काळ अन्न व औषध प्रशासन विभागाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त निखिल कुलकर्णी यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील बारा शिक्षण विस्ताराधिकारी झाले उपशिक्षणाधिकारी

## सोनवणे, काकडे, हजारे, शिंदे, उजगरे, काकडे, राऊत यांना उपशिक्षणाधिकारी पदी पदोन्नती

बीड । प्रतिनिधी

**शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २४ एप्रिल २०२६ च्या शासन आदेशानुसार राज्यातील जिल्हा तांत्रिक सेवेतील 'शिक्षण विस्तार अधिकारी' या सेवेतील संवर्गातून महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब उपशिक्षणाधिकारी तथा तत्सम संवर्गातील रिक्त पदावर ५१ जणांना पदोन्नती देण्यात आली आहे.**








बीड जिल्ह्यातील शिक्षण विस्तार अधिकारी दर्जाच्या १२ जणांचा सेवा जेष्ठतेनुसार या पदोन्नतीमध्ये समावेश आहे. पदोन्नतीमध्ये धनंजय बोंदार्डे, पं.स., जामखेड, जिल्हा अहिल्यांनगर, बबन सोपानराव सोनवणे पं.स., बीड., राऊत रंगनाथ नामदेव विभागीय सहाय्यक सचिव, माध्यमिक उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ, लातूर, धनंजय रामराव शिंदे, उपशिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद बीड, ऋषिकेश जनार्दन शेळके, अधीक्षक, वेतन व भत्ते शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प., मोहन त्रिंबक काकडे उपशिक्षणाधिकारी, नानाभाऊ गणपती हजारे, उपशिक्षणाधिकारी, जि.प., सातारा, हनुमान गहिनीनाथ गव्हाणे, उपशिक्षणाधिकारी शिक्षणाधिकारी (प्रा.), जळगाव, श्रीमती हिना उमर अन्सारी, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती परळी, श्रीमती प्रणिता पंडितराव कापसे, उपशिक्षणाधिकारी, (प्रा.) गोंदिया, खान समंदर अमित खान, उपशिक्षणाधिकारी, (माध्य.) जिल्हा परिषद, गोंदिया, बीड, परळी व वडवणीला मिळाले पदाचे गट शिक्षणाधिकारी बीड जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या बारा शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना पदोन्नतीने उपशिक्षणाधिकारी पदी नियुक्ती मिळाली आहे. मात्र बीड जिल्ह्यासाठी बीड परळी वडवणी या ठिकाणी पदाचे गटशिक्षणाधिकारी मिळाले आहे. तर माध्यमिक शिक्षण विभागाच्या उपशिक्षणाधिकारी या पदावर धनंजय शिंदे यांची नियुक्ती झाली आहे.

# कैलास मैड यांना मातृशोक

बीड । प्रतिनिधी



येथील सराफा व्यापारी कैलास मैड व ट्विनकलिंग स्टार स्कूल चे संचालक गणेश मैड यांच्या मातोश्री कै.ग. भा. लक्ष्मीबाई गोपीनाथ मैड यांचे अल्पशा आजाराने दि. २२/४/२०२६ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर येथील मोंढा भागातील अमर धाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पाच मुली आणि दोन मुले ,नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# महाविद्यालयांना उद्यापासून उन्हाळी सुट्टया जाहीर; विद्यापीठातील २ मे पासून सुट्टी

जालना । प्रतिनिधी

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना रविवारपासून (दि.२६) उन्हाळी सुट्टया घोषित करण्यात आल्या आहेत. तर विद्यापीठातील पदव्यूत्तर विभागांना येत्या २ मे पासून उन्हाळी सुट्टया असणार आहेत.**

मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षापासून 'ॲकडमिक कॅलेंडर'चे तंतोतंत पालन करण्यात येत आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात १६ जून रोजी सुरुवात झाली. तर १५ एप्रिल २०२६ हा कामकाजाचा अखेरचा दिवस असणार आहे. विद्यापीठाशी संलग्नित बीड, धाराशिव, जालना, छत्रपती संभाजीनगर चारही जिल्हयातील महाविद्यालयांना २६ एप्रिल ते १४ जून या दरम्यान उन्हाळी सुट्टया असणार आहेत. तर विद्यापीठाचा मुख्य परिसर, धाराशिव उपपरिसर येथील पदव्यूत्तर विभागांना २ मे पासून उन्हाळी सुट्टया असणार आहेत. विद्यापीठ परिषद व संलग्नित महाविद्यालयांचे नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ येत्या १५ जून पासून सुरु होणार आहे, अशी माहिती अभ्यासक्रम विभगाचे उपकुलसचिव डॉ.संजय कवडे यांनी दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्यावतीने आगामी शैक्षणिक वर्षात प्रवेश प्रक्रिया ते परीक्षा, निकालापर्यंत ॲकडमिक कॅलेंडरचे तंतोतंत पालन करण्यात येईल, असे मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी विद्यापरिषदेच्या बैठकीत घोषित केले. २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात युवक महोत्सव, लोककला महोत्सव, आविष्कार स्पर्धा, दीक्षांत समारंभ या सर्वांचे वेळापत्रक घोषित करण्यात आले आहे. विद्या परिषद बैठक मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यानुसार शैक्षणिक वेळापत्रक व पुढील वर्षातील सर्व स्पर्धा, कार्यक्रमांच्या नियोजनासाठी 'ॲकडमिक कॅलेंडर-२०२६-२७' घोषित करण्यात आले. यानूसार नवीन सत्र १५ जून २०२६ रोजी सुरु होईल. ३१ जुलैपर्यंत पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. २९ व ३० रोजी 'आविष्कार' स्पर्धा होईल. तर ५ ते ८ ऑक्टोबर दरम्यान केंद्रीय युवक महोत्सव घेण्यात येणार आहे. ऑक्टोबर महिन्यात दीक्षांत समारंभ होईल. तर २१ ऑक्टोबर ते १५ डिसेंबर दरम्यान प्रथम सत्र परीक्षा होणार आहेत. १६ डिसेंबर रोजी द्वितीय सत्र सुरु होईल. नामविस्तार दिनापुर्वी १२ व १३ जानेवारी रोजी दुसरा लोककला महोत्सव घेण्यात येणार आहे. ९ एप्रिल ते १९ मे २०२७ या काळात वार्षिक परीक्षा घेण्यात येणार आहेत. या प्रमाणे हे नवीन वेळापत्रक असणार आहे, असे शैक्षणिक विभागाचे उपकुलसचिव डॉ गणेश मंझा यांनी कळविले आहे.

# पान १ वरून...

### खत दरवाढीने शेतकऱ्यांचे

दर गगनाला भिडल्याने विक्रीत घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ''दर वाढल्यामुळे शेतकरी खरेदी टाळत आहेत. त्यामुळे व्यवसाय टिकवणे कठीण झाले आहे,'' असे काही विक्रेत्यांनी सांगितले. दरम्यान, खतांच्या वाढत्या किमतींवर नियंत्रण आणून अनुदानात वाढ करावी, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून जोर धरत आहे. सरकारने तातडीने हस्तक्षेप केला नाही, तर शेती पडीक ठेवण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. राज्यातील विविध भागांत या प्रश्नावरून निषेधाची ठिणगी पेटू लागली असून, येत्या काळात आंदोलन तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर सरकार कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---------------

### पंकजा मुंडेंना मुख्यमंत्री

उपस्थित केले. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या उमेदवारीबाबतही भाष्य केले. ''महाविकास आघाडीच्या आमदारांसाठी दिलासा देण्यासाठी ठाकरे यांनी विधान परिषदेत जाणं गरजेचं आहे,'' असे ते म्हणाले. तसेच सुप्रिया सुळे यांनीही ठाकरे यांनी आघाडीचे नेतृत्व करावे, अशी भूमिका मांडल्याचे त्यांनी सांगितले.

---------------

### शिवीगाळ प्रकरणी संजय

प्रयत्न केला, मात्र अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. स्पष्टीकरण देताना गायकवाड म्हणाले, ''अलीकडील वादात माझ्या तोंडून काही अयोग्य शब्द गेले, याबद्दल मी मनापासून दिलगिरी व्यक्त करतो. मात्र हा विषय वादाचा नसून संस्कार आणि आदराचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख नेहमी सन्मानपूर्वकच व्हायला हवा.'' दरम्यान, या वादावर प्रतिक्रिया देताना शिवसेना नेते उदय सामंत यांनीही भूमिका स्पष्ट केली. ''गायकवाडांनी नेमका कोणत्या बाबीवर आक्षेप घेतला, हे समजून घेण्यासाठी त्यांच्याशी चर्चा करणार आहे. पुस्तक वाचल्यानंतरच यावर सविस्तर मत मांडता येईल,'' असे त्यांनी सांगितले.

-------------

### पंजाब मध्ये आप

याआधी राघव चड्ढा, संदीप पाठक आणि अशोक मित्तल यांनी पत्रकार परिषद घेऊन पक्षात फूट पडल्याची घोषणा केली होती. त्यांनी सांगितले की, राज्यसभेतील आम आदमी पक्षाच्या एकूण १० खासदारांपैकी दोन-तृतीयांश म्हणजे सात खासदारांनी घटनात्मक तरतुदीनुसार भाजपमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे. या सात खासदारांमध्ये हरभजन सिंह, राजिंदर गुप्ता, विक्रमजीत सिंह साहनी आणि स्वाती माळीवाल यांचाही समावेश असल्याचे चड्ढा यांनी सांगितले. या निर्णयामागील कारण स्पष्ट करताना चड्ढा यांनी आम आदमी पक्ष मूळ विचारधारेपासून दूर गेल्याचा आरोप केला. ''मी या पक्षासाठी १५ वर्षे दिली, मात्र आता पक्ष देशहिताऐवजी वैयक्तिक फायद्यासाठी काम करत आहे. गेल्या काही वर्षांत मी चुकीच्या पक्षात असल्याची जाणीव झाली. त्यामुळे आज मी पक्षापासून दूर होत असून जनतेजवळ जाण्याचा निर्णय घेतला आहे,'' असे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच चड्ढा यांना राज्यसभेतील उपनेतेपदावरून हटविण्यात आले होते. त्यानंतर पक्षातील काही नेत्यांनी त्यांच्यावर भाजपबाबत मवाळ भूमिका घेतल्याचा आरोप केला होता. या आरोपांना उत्तर देताना चड्ढा यांनी हे सर्व नियोजित आणि समन्वित अभियान असल्याचे म्हटले होते. ''माझ्याविरोधात एकाच प्रकारच्या आरोपांची पुनरावृत्ती होत आहे. हे योगायोग नसून एक नियोजित हल्ला आहे. सुरुवातीला मी प्रतिक्रिया देणे टाळले, मात्र खोटे वारंवार सांगितल्यास ते खरे वाटू शकते, म्हणून मी उत्तर देण्याचा निर्णय घेतला,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

-----------------

### आ.गायकवाडांच्या विधानाशी

त्यामुळे या प्रकरणात शिवसेना पक्ष आणि नेतृत्त्वाने हात वर केले असून यामुळे संजय गायकवाड यांच्या अडचणी वाढल्या आहेत. संजय गायकवाड हे आमदार आहेत, त्यांनी बोलताना संयम ठेवला पाहिजे. त्यांनी वापरलेली भाषा चूक आहे.या सगळ्यामुळे एकनाथ शिंदे आणि पक्षाची बदनामी होते, हे संजय गायकवाडच्या लक्षात येत नाही. मी प्रवक्ता म्हणून एवढेच सांगेन की, आम्ही त्यांच्या विचारांशी सहमत नाही. एका पुस्तकावरुन अशाप्रकारे शिवीगाळ करणे आणि पुस्तकाची सत्यता काय आहे, हे जाणून न घेता प्रतिक्रिया देणे संयम नसल्याचे द्योतक आहे. पण त्यांच्या अशा वागण्याने पक्ष नेतृत्त्वावर आक्षेप येईल, हे गायकवाडच्या लक्षात आलं नाही, असे प्रकाश महाजन यांनी म्हटले.

-----------

### चमत्कार सिद्ध करा, ८०

उत्तीर्ण करून दाखवाव्यात. १० व्यक्तींना समिती पुढे उभे करेल. धीरेंद्र शास्त्री यांनी त्या व्यक्तींचे नाव, वडिलांचे नाव, वय आणि मोबाइल सांगावे, याशिवाय एका सीलबंद पाकिटात आधीच ठेवलेले नंबर अचूक सांगायचे, तसेच शेजारच्या खोलीत ठेवलेल्या दहा वेगवेगळ्या वस्तूंची ओळख शास्त्री यांनी त्यांच्या दिव्यशक्तीने पटवून कागदावर लिहून द्यायची आहे. या दोन्ही चाचण्यांमध्ये शास्त्री ९० टक्केही अचूक असल्यास त्यांना ८० लाख रुपये दिले जातील. मात्र, अपयशी ठरल्यास ८ लाखांची अनामत रक्कम जप्त होईल . नागपुरात या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडीओ रेकॉर्डिंग केले जाईल. देखरेख ठेवण्यासाठी दोन्ही बाजूंच्या संमतीने पाच सदस्यांची समिती नेमली जाईल, असेही श्याम मानव म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात अंधश्रद्धा निर्मूलनाएवजी ती वाढल्याचा आरोप मानव यांनी केला. अंधश्रद्धा निर्मूलनाबाबतच्या २२ सभा झाल्या. मात्र, आता हा प्रकल्प रखडला आहे. त्यामुळेच अशोक खरात यांच्यासारखे भोंदू समाजात वाढल्याचे सांगितले. दरम्यान,आंबेडकरी विचारांना मानणाऱ्या माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सहकुटुंब धीरेंद्र शास्त्री यांची भेट घेणे गंभीर असल्याचेही सांगितले.

-------------

### विधानपरिषद निवडणूक;

उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पुन्हा विधान परिषदेवर निवडून जाण्याची शक्यता वाढली आहे. कॉंग्रेसने आधीच त्यांना पाठिंबा दिलेला होता. राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) नेत्या खा. सुप्रिया सुळे यांनी, ठाकरे यांनीच विधान परिषद लढावी, ही आमच्या पक्षाची आग्रहाची विनंती आहे. ते राज्यातील अनुभवी आणि ज्येष्ठ नेते आहेत. त्याचा फायदा राज्याला आणि सभागृहाला नेहमीच होत राहील, असा आमचा विश्वास आहे. मविआने त्यांच्या नावाचा सकारात्मक विचार करावा, असे एक्स पोस्टवर म्हटले. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मातोश्रीवर जावून उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केली.आमदारकीचा एक उमेदवार ठरविताना इच्छुकांच्या गर्दीमुळे अजित पवार गटाच्या अध्यक्ष व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व पक्षातील प्रमुख नेत्यांची डोकेदुखी वाढणार आहे. 'दादानिष्ठ' उमेदवारच द्यावा, असा पक्षात सूर आहे. या एका जागेसाठी प्रयत्न करत असलेल्यांमध्ये राजेंद्र जैन, अनिकेत तटकरे, आनंद परांजपे, सुनील टिंगरे, उमेश पाटील, विक्रम संजय काकडे यांचा समावेश आहे.

-----------

### सूर्य कोप लापारा ४५ अंशावर,

तसेच, कोकण आणि गोव्यात २४ एप्रिल रोजी काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. वादळी वाऱ्यांचा वेग ३० ते ५० किमी प्रतितास राहू शकतो, त्यामुळे शेती व झाडांना काही प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे.

---------

## थोडक्यात

### अनुसुचित जातीच्या प्रवर्गातील घटकांसाठी कार्यशाळेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

आयुक्त समाजकल्याण आयुक्तालय पुणे यांच्या वतीने महाराष्ट्रातील अनुसुचित जातीच्या प्रवर्गातील घटकांना लाभ देण्यासाठी, समाज कल्याण विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहितीसाठी कार्यशाळेचे आयोजन.

दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सकाळी. ११.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकिय विश्रामगृह समोर, नगर रोड बीड येथे करण्यात आले आहे. मातंग समाजातील बीड जिल्हातील लाभार्थींनी या कार्यशाळेत सहभागी व्हावे असे आवाहन प्रदीप भोगले सहाय्यक आयुक्त समाज कल्याण अधिकारी , व जिल्हा व्यवस्थापक,साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. बीड यांनी केले आहे.

### इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनां नामांकित शाळेत प्रवेश घेण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, व लातूर या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुला मुलींना इयत्ता पहिली (१ ) मध्ये शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेवु इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. अर्जासोबत अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत असावी. विद्यार्थी दारिद्रय रेषेखालील असेल तर त्यासंबंधीत छायांकित प्रत व दारिद्रय रेषा अनु क्रमांक नमुद करावा, पालकाची उत्पन्न मर्यादा ही १ लाख एवढी असुन यासाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जासोबत पालकांनी समंतीपत्रक देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईजचे फोटो, जन्म तारखेचा पुरावा व वैद्यकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. या योजनेत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच विधवा, घटस्फोटीत, निराधार व दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील पाल्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल विद्यार्थ्यांचे पालक शासकीय /निमशासकीय नोकरदार नसावेत प्रकल्प कार्यालयात प्रवेश अर्ज विनामुल्य उपलब्ध असुन दिनांक २५ ने २०२६ पर्यंत परिपुर्ण प्रवेश अर्ज जमा करणे आवश्यक आहे.या योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर होणारा संपुर्ण खर्च आदिवासी विकास विभाग करणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, रिलायन्स मॉलच्या पाठीमागे, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षण विभागात संपर्क साधावा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या पाल्यास शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत प्रवेश घेण्याचे आवाहन छत्रपती संभाजीनगर,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे, प्रकल्प अधिकारी, यांनी केले आहे.



**परळी तहसील माहेश्वरी सभा च्या नवनिर्वाचित अध्यक्ष पदी श्री शामसुंदरजी तोषनिवाल एवं सचिव पदी रमेशजी सारडा यांची नियुक्ती झाली असून सर्व समाज बांधव कडून शुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या**

# रिअल इस्टेटचे भाव मध्यस्थांमुळे गगनाला भिडले

## चढ्या भावामुळे सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न धुळीस

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह शहरात सध्या जमिनी आणि घरांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात मोठी तेजी पाहायला मिळत आहे. मात्र, याच तेजीचा फायदा घेत काही अनधिकृत आणि नवख्या मध्यस्थांनी बाजारात प्रवेश केला असून, ते अव्वाच्या सव्वा किमती सांगून ग्राहकांची दिशाभूल करत आहेत. या वाढत्या 'दलालराज'चा फटका केवळ ग्राहकांनाच नाही, तर या क्षेत्रात अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे आणि कायदेशीररित्या काम करणाऱ्या एजंटनाही बसत आहे. या गंभीर विषयावर ॲड. आदर्श जाधव यांनी प्रकाश टाकला असून नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

बोगस एजंटमुळे मार्केटची विश्वासार्हता धोक्यात

कोणताही अनुभव नसताना केवळ कमिशनच्या आमिषाने अनेक जण या क्षेत्रात उतरले आहेत. मूळ मालकाच्या किमतीत मोठी वाढ करून सांगणे, खोट्या



आश्वासनांवर प्लॉट विकणे यामुळे रिअल इस्टेट मार्केटमधील विश्वासार्हता कमी झाली आहे. जेव्हा एखादा व्यवहार फसवणुकीचा ठरतो, तेव्हा त्याचा ठपका संपूर्ण एजंट समुदायावर ठेवला जातो. यामुळे जे एजंट कागदपत्रांची रीतसर पडताळणी करून आणि माफक शुल्कात सेवा देतात, त्यांच्याकडेही ग्राहक संशयाने पाहू लागले आहेत.

प्रामाणिक एजंटचे नुकसान का होतेय?

१. अविश्वास: काही चुकीच्या लोकांमुळे ग्राहकांचा 'एजंट' या शब्दावरचा विश्वास उडाला आहे. त्यामुळे लोक आता एजंटला टाळून थेट व्यवहार करण्याला पसंती देत आहेत.

२. चुकीची स्पर्धा: जे एजंट जास्त नफा कमावण्यासाठी चुकीचे भाव सांगतात, त्यांच्यामुळे मार्केटचे दर विनाकारण वाढतात. अशा वेळी योग्य दरात व्यवहार करून देणाऱ्या प्रामाणिक एजंटला काम मिळणे कठीण झाले आहे.

३. प्रतिमेला तडा: चुकीच्या पद्धतीने व्यवहार करणाऱ्या लोकांमुळे समाजात 'सगळेच एजंट फसवणूक करतात' असा चुकीचा संदेश जात आहे, ज्याचा फटका अनुभवी व्यावसायिकांना बसत आहे.

ॲड. आदर्श जाधव यांचे नागरिकांना आवाहन

या संदर्भात बोलताना ॲड. आदर्श जाधव म्हणाले की, सध्या बीडमध्ये रिकामे प्लॉट, जागा, फ्लॅट आणि घरांची दलाली करणाऱ्या एजंटची संख्या प्रमाणाबाहेर वाढली आहे. हे लोक केवळ स्वतःच्या नफ्यासाठी अव्वाच्या सव्वा भाव सांगून ठेवत आहेत. यामुळे घेणाऱ्याचे आर्थिक नुकसान होत आहेच, पण फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. कालच एका दलालावर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे, ही बाब अत्यंत गंभीर आहे.

थेट व्यवहार आणि अधिकृत मध्यस्थ हाच पर्याय

फसवणुकीच्या प्रकाराला आळा घालण्यासाठी ग्राहकांनी आणि मालकांनी खालील गोष्टींचे पालन करावे:

थेट संवाद: घेणाऱ्याने थेट मालकाकडूनच प्लॉट किंवा घर घेण्याचा प्रयत्न करावा.

विक्रेत्यांची भूमिका: मालकाने सुद्धा एजंटकडून व्यवहार न करता थेट घेणाऱ्या सोबत चर्चा करावी, जेणेकरून कोणाचेही आर्थिक नुकसान होणार नाही.

कायदेशीर पडताळणी: केवळ 'जास्त किंमत काढून देतो' म्हणणाऱ्यांच्या मागे न लागता, अधिकृत मध्यस्थ किंवा तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच व्यवहार पूर्ण करावा.

तज्ज्ञांचे मत: रिअल इस्टेट मार्केटमधील ही अस्वस्थता दूर करण्यासाठी मध्यस्थांनी देखील स्वतःची एक आचारसंहिता पाळणे गरजेचे आहे, तरच ग्राहकांचा विश्वास पुन्हा संपादन करता येईल. 'थेट व्यवहार' हाच फसवणूक टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग असल्याचे ॲड. आदर्श जाधव यांनी स्पष्ट केले आहे.

# पाटोदा-मांजरसुंबा रस्त्यावरील पुलाच्या रखडलेल्या कामावरून ठेकेदारावर 'सदोष मनुष्यवधाचा' गुन्हा दाखल करण्याची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पैठण-पंढरपूर या महत्त्वाच्या राज्य महामार्गावरील पाटोदा येथील वांजरा नदीवरील पुलाचे काम गेल्या अनेक दिवसांपासून रखडलेले आहे. या अर्धवट कामामुळे वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून अनेक भीषण अपघात घडले आहेत. या गंभीर बाबीची दखल घेत पाटोदा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. दिपालीताई राजेंद्र जाधव यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, संबंधित कामाच्या एजन्सीवर 'सदोष मनुष्यवधाचा' गुन्हा दाखल करण्याची मागणी तहसीलदारांकडे केली आहे.



नेमके प्रकरण काय?

मिळालेल्या माहितीनुसार, पैठण-पंढरपूर रस्त्याचे काम सध्या सुरू आहे. मात्र, पाटोदा शहरातून जाणाऱ्या वांजरा नदीवरील पुलाचे काम संबंधित ठेकेदाराने अद्याप पूर्ण केलेले नाही. पुलाचे काम अर्धवट असल्याने आणि पोहोच रस्ते (प्रोच रोड) नीट नसल्याने या ठिकाणी वाहतुकीची मोठी कोंडी होत आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या खड्ड्यांमुळे आणि अर्धवट कामामुळे अनेक दुचाकीस्वार पडून गंभीर जखमी झाले आहेत.

वारंवार सूचना देऊनही दुर्लक्ष

नगराध्यक्षांनी पत्रात नमूद केल्याप्रमाणे, शहरात साजरे झालेले छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि परशुराम जयंती यांसारख्या सार्वजनिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर हे काम पूर्ण करण्यासाठी संबंधित एजन्सीला वारंवार लेखी पत्रे देण्यात आली होती. मात्र, प्रशासकीय सूचनांकडे ठेकेदाराने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे.

**गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्याची मागणी**

ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे निष्पाप नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. पारगाव रस्त्याचे कामही प्रलंबित असल्याने अडचणीत भर पडली आहे. त्यामुळे संबंधित एजन्सीवर कडक कारवाई करून त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, यासाठी पोलीस निरीक्षकांना तात्काळ आदेश द्यावेत, अशी मागणी सौ. दिपालीताई जाधव यांनी तहसीलदारांना दिलेल्या पत्राद्वारे केली आहे. आता या मागणीवर प्रशासन काय भूमिका घेते आणि रखडलेल्या पुलाचे काम कधी मार्गी लागते, याकडे संपूर्ण पाटोदा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## पान ६ वरून...

### ग्रामीण आरोग्य व्यवस्थेच्या

गावातील सांडपाणी आणि घनकचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करून गावाला रोगमुक्त करणे,या योजनेअंतर्गत गावाला 'आरोग्यसंपन्न' घोषित करण्यासाठी काही कठोर आणि महत्त्वपूर्ण निकष ठरवण्यात आले आहेत. गावातील सर्व बालकांचे आणि गरोदर मातांचे लसीकरण वेळेवर पूर्ण असणे बंधनकारक आहे. अंगणवाडीच्या माध्यमातून मुलांच्या पोषणाकडे लक्ष देऊन गाव पूर्णपणे कुपोषणमुक्त करणे. प्रत्येक ग्रामस्थाला पिण्यासाठी शुद्ध आणि क्लोरिनयुक्त पाणी उपलब्ध करून देणे, गाव १०० टक्के हागणदारीमुक्त असणे आणि प्रत्येक कुटुंबाकडून शौचालयाचा वापर केला जाणे, गावातील ३० वर्षांवरील सर्व नागरिकांची असंसर्गजन्य आजारांसाठी (उदा. रक्तदाब,मधुमेह) मोफत आरोग्य तपासणी पूर्ण करणे,ही योजना केवळ सरकारी पातळीवर न राहता ती एक लोकचळवळ व्हावी, यासाठी ग्रामपंचायत, आरोग्य विभाग आणि ग्राम आरोग्य स्वच्छता समिती एकत्रितपणे काम करत आहेत. आरोग्य सेवक, सेविका आणि आशा स्वयंसेविकांमार्फत घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले जात आहे, ग्रामपंचायतीकडून निधी आणि नियोजनाची जबाबदारी पार पाडली जात आहे.

आरोग्यविषयक जागरूकता वाढल्यामुळे आजारांचे प्रमाण घटून,ग्रामस्थांचा उपचारांवरील अनावश्यक खर्च वाचणार आहे.

गावात स्वच्छतेचे वातावरण निर्माण झाल्याने साथीच्या आजारांना आळा बसेल.ज्यामुळे गावाची प्रतिष्ठा संपूर्ण राज्यात वाढते.आपले गाव 'आरोग्यसंपन्न' बनवण्याच्या या प्रक्रियेत ग्रामस्थांचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी नागरिकांनी आपल्या गावातील ग्रामपंचायत कार्यालय किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. शिवानी बोडखे आणि डॉ.अमान बेग यांनी केले आहे.

### चिंचाळा येथे अवैध दारू

कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, जर प्रशासनाने लवकरात लवकर योग्य ती पावले उचलली नाहीत, तर ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने पोलीस ठाण्यासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

### आंबेडकरांनी संविधानाच्या

आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी हिंदू कोड बिल मंजूर करून त्यांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून दिले. अशिक्षित समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोफत व सक्तीचे शिक्षण सुरू केले. एक व्यक्ती एक मताचा अधिकार देऊन मतदार राजा बनविले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ग, जात, धर्म, लिंग असा भेदभाव न करता सर्व भारतीयांना सक्षम लोकशाही बहाल केली.यावेळी किसन तांगडे, श्रीकांत नवले, सुभाष तांगडे, शाम वीर, विष्णू जोगदंड, मुन्ना फड, बाळू भालेराव, राजेंद्र भालेराव, दादासाहेब लांडे, भैय्या भालेराव, विनोद तांगडे, कपिल तांगडे, प्रदीप तांगडे यांच्यासह शेकडो आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते.

### आदित्य इंजिनिअरिंगच्या

तंत्रज्ञान आणि ऊर्जा बचतीची पद्धत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उपकरणांद्वारे समजावून सांगण्यात आली. ही भेट यशस्वी करण्यासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. निलेश बहादुरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. मेकॅनिकल विभागप्रमुख प्रा. एल. बी. राऊत यांच्या नेतृत्वाखाली प्रा. जाधव विलास आणि प्रा. यु. एस. मिर्झा यांनी या दौऱ्याचे नियोजन केले. यावेळी विभागातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि इंधन बचतीसाठी इलेक्ट्रिक वाहने हे प्रभावी माध्यम ठरत आहेत. आगामी काळात ऑटोमोबाईल क्षेत्रात 'इलेक्ट्रिक क्रांती' होणार असून, या क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन स्तरावरच मिळावे, हा या भेटीचा मुख्य उद्देश होता.

**करिअरच्या संधींवर मार्गदर्शन**

भविष्यात ई-वाहनांचे महत्त्व आणि या क्षेत्रातील रोजगाराच्या संधी यावरही यावेळी चर्चा करण्यात आली. एसी आणि डीसी चार्जिंगमधील फरक, बॅटरीचे प्रकार आणि त्यांची देखभाल कशी करावी, याचे तांत्रिक मार्गदर्शन तज्ज्ञांकडून करण्यात आले. या उपक्रमामुळे पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

**विद्यार्थ्यांनी अद्ययावत तंत्रज्ञानाशी सुसंगत राहावे**

आजच्या वेगाने बदलणाऱ्या काळात ऑटोमोबाईल क्षेत्रात मोठी क्रांती होत आहे. केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक आहे. इलेक्ट्रिक वाहने ही भविष्याची गरज असून, या क्षेत्रातील तांत्रिक बारकावे आणि रोजगाराच्या संधींची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने अशा औद्योगिक भेटींचे आयोजन करण्यात येते. आदित्य शिक्षण संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी नेहमीच कटिबद्ध आहे.

-डॉ. आदित्य सारडा, संचालक, आदित्य शिक्षण संस्था, बीड*

### बीड च्या गटशिक्षणाधिकारीपदी

पंचायत समिती परळी,बाबासाहेब उजगरे उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सांगली ,श्रीमती प्रणिता पंडितराव कापसे उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद गोंदिया,खान समंदर हमीद खान उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली

सदर पदोन्नत्या माननीय सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याची का २८३०६/ २० १७ च्या आदीन राहून पदोन्नतीच्या कोट्यतील सर्व रिक्त पदे२५.५.२००४ च्या सेवा जेष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात स्वरूपात भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या ७.५. २००२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनानुसार देण्यात येत आहेत .संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त अधिकाऱ्यास पदोन्नती या ठिकाणी रुजू होण्याकरिता तात्काळ कार्यमुक्त करण्याची कारवाई करावी तसेच संबंधित अधिकारी यांनी पदोन्नती आदेश निर्गम झाल्याच्या दिनांक पासून ३० दिवसाच्या आत पदोन्नतीच्या पदावर रुजू व्हावे व संबंधित अधिकारी व रु जाचा अहवाल आयुक्त शिक्षण यांना सादर करावा असे आदेश महाराष्ट्र शासनाचे उपसचिव मो.बा. तहसीलदार यांनी आज दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी २६ रोजी निर्गमित केले आहेत

बीड जिल्हा परिषद मधील पदोन्नती पात्र सर्व उपशिक्षणाधिकारी गट शिक्षण अधिकारी यांचे यांचे अभिनंदन महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष गौतम चोपडे तुकाराम पवार ठाकूर ,जी एन भोरे ,कांचन गायकवाड ,बांगर शिवाजी प्रल्हाद जावळे ,डीजे तांदळे यांनी केले आहे.

### धारूर चौसाळा बोरिवली

वर्षभरापासून पाठपुरावा करून की नांदूर चौसाळा पाटोदा या मार्गे ठाणे बोरिवली या ठिकाणी जाण्यास खूप अडचण निर्माण होत होती वेगवेगळ्या ठिकाणी गाड्या ची बदल करून महिला वृद्ध प्रवाशांच्या वेळ वाया जात होता आता मा. मंत्री प्रताप सरनाईक यांनी धारूर केज नांदूर चौसाळा पाटोदा अहिल्यानगर पुणे पनवेल ठाणे बोरिवली अशी नव्या स्वरूपात आलेली लाल परी आरामशीर गाडी प्रवाशांच्या सोयीसाठी धारूर मधून सकाळी ७ वाजता सुटणारी व बोरवली मधून सकाळी ६.३० सुटणारी ही गाडी ऑनलाइन आरक्षणावर सुद्धा सुरू होणार आहे त्यामुळे धारूर नांदूर चौसाळा व पाटोदा या गावांच्या शेजारील सर्व गावातील प्रवाशांनी या गाडी तून प्रवास करून फायदा घ्यावा अशी विनंती ही गाडी सुरू करण्यासाठी परिश्रम घेतलेले ज्ञानोबा शिंदे नाहोली भीमराव शिंदे नांदूर घाट व पत्रकार विकास सर्वज्ञ यांनी केले

# अपहरण करून बालविवाह करण्यासाठी मदत केल्याच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीस जामीन मंजूर

बीड। प्रतिनिधी

अंबोरा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्र. ४१६/२०२५ आपहरण आणि बालविवाह करण्यासाठी मदत केल्याच्या प्रकरणातील आरोपीस जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांनी जामीन मंजूर केला आहे.अरोपी तर्फे वकील





अँड.शुभाष काळे, अँड.शेख सद्दाम शेख इस्माईल यांनी काम पाहिले

या प्रकरणात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ८७, १३७(२) तसेच बालविवाह प्रतिबंधक कायदा कलम ९, १० आणि ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदर प्रकरणात आरोपीने अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्याशी बालविवाह केल्याचा गंभीर आरोप आहे. घटनेनंतर अंबोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास करून आरोपीस अटक केली. व त्या नंतर आरोपीच्या वतीने आरोपीचे वकिल अँड.शुभाष काळे,अँड.शेख सद्दाम शेख इस्माईल यांनी जामिनासाठी अर्ज दाखल करत, तपास पूर्ण झाल्याने पुढील कोठडीची आवश्यकता नसल्याचा युक्तिवाद केला. तसेच आरोपीकडून तपासात सहकार्य करण्यात येईल, असेही न्यायालयासमोर नमूद करण्यात आले.

दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांनी प्रकरणातील पुरावे, परिस्थिती आणि कायदेशीर बाबींचा विचार करून आरोपीस अटींसह जामीन मंजूर करून आरोपीची जामीनावर मुक्तता केली.या खटल्यात आरोपींच्या वतीने ड. सुभाष काळे यांनी मुख्य बाजू मांडली. त्यांना या कायदेशीर लढाईत ड.शेख सद्दाम शेख इस्माईल, यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या निर्णयामुळे परिसरात चर्चेला उधाण आले असून पुढील तपास अंबोरा पोलीस करत आहेत.

# अंबाजोगाई येथील भव्य अश्व रिंगण सोहळा २०२६ चे सर्व दिंड्यांना अधिकृत निमंत्रण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे अंबाजोगाई मध्ये होणाऱ्या भव्य अश्व रिंगण सोहळा २०२६ चे अधिकृत निमंत्रण संतश्रेष्ठ नामदेव महाराज संस्थान नरसी नामदेव व संतश्रेष्ठ जनाबाई संस्थान गंगाखेड या ठिकाणी स्वागताध्यक्ष व अंबाजोगाईचे नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा उर्फ काकाजी यांच्या वतीने संयोजन समितीचे सचिव तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी विश्वस्तांना दिले. याप्रसंगी संतश्रेष्ठ नामदेव महाराज संस्थानचे विश्वस्त माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर, दिंडी चालक श्री भागवतराव पाटील, हरिभक्त परायण मगर महाराज, संयोजन समितीतील शशिकांत नाना गायकवाड, अजय राठोड, संतश्रेष्ठ जनाबाई संस्थानचे दिंडी प्रमुख हरिभक्त परायण शिवाजी महाराज चौधरी यांची उपस्थिती होती. गेल्या १४ वर्षांपासून अंबाजोगाई मध्ये मराठवाड्यातील पहिला भव्य अश्व रिंगण सोहळा संपन्न



होतो. अंबाजोगाई तसेच पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्त या भव्य अश्व रिंगण सोहळ्याचा नयनरम्य आणि भक्ती भावपूर्ण देखावा डोळ्यात साठवून घेतात. यानिमित्ताने शालेय विद्यार्थ्यांवर वारकरी सांप्रदायाचे व संतांचे विचार रुजवले जावेत त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावे यासाठी शालेय विद्यार्थ्यांच्या समूह दिंडी नृत्य स्पर्धेचेही आयोजन केले जाते. या स्पर्धेमध्येही हजारो बालके विविध संतांच्या भूमिकेमध्ये सादरीकरण करतात. यावर्षीचा हा सोहळा भव्य दिव्य स्वरूपात संपन्न व्हावा यासाठी संयोजन समितीचे स्वागताध्यक्ष व आंबा नगरीचे नूतन लोकनियुक्त नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा उर्फ काकाजी, हरिभक्त परायण बाबा महाराज जवळगावकर, श्री दिलीप दादा सांगळे, माजी नगराध्यक्ष महादू मस्के, श्री मारुतीराव रेड्डी, श्री दिलीप गीते, श्री बळीराम चोपणे, अनंत आरसुडे, प्रसिद्धी प्रमुख अभिजीत गाठाळ, अविनाश मुडेगावकर, प्रशांत आदनाक, संतोष आबा लोमटे, वैजनाथ देशमुख इत्यादी परिश्रम घेत आहेत अशी माहिती संयोजन समितीचे सचिव तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी दिली आहे.

# दिव्यांगांना शिवाई बस प्रवासात आरक्षण,आरोग्य सेवेत आरक्षण तसेच दिव्यांगांचे मानधन तात्काळ करण्यासाठी डॉ.संतोष मुंडे यांची परिवहन मंत्री,आरोग्य मंत्री व दिव्यांग कल्याण मंत्री यांच्याकडे मागणी

परळी । प्रतिनिधी

दिव्यांग बांधवांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान राज्याचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी मुंबई येथे सकारात्मक पाठपुरावा करत राज्याचे दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे,परिवहन मंत्री प्रताप सरनाईक तसेच सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन दिव्यांगांच्या विविध मागण्यांसाठी निवेदने दिली.

दिव्यांग पोर्टल सहाय्यक निधीसाठी दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांना निवेदन

तालुका स्तरावर दिव्यांग पोर्टल सहायक निधीसाठी शिबिरे राबविण्यात यावीत, तसेच पोर्टलसाठी लागणारी अनावश्यक कागदपत्रे कमी करून दिव्यांगांना होणारा त्रास कमी करण्यात यावा याबाबत डॉ संतोष मुंडे यांनी दिव्यांग कल्याण विभागाचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांची प्रत्यक्ष भेट घेवून निवेदन दिले. निवेदनातील मागणीवर मंत्री अतुल सावे यांनी सकारात्मक प्रतिक्रिया देत त्वरित कार्यवाही करण्यात येईल असे





आश्वासन दिले.तसेच मागील दोन महिन्यांपासून बंद असलेले २५०० मानधन लवकरच सुरू होणार असून, ८ ते १५ दिवसांत निधी सुरू होईल असेहि आश्वासन दिले. राज्य परिवहन महामंडळाच्या शिवाई तसेच स्लीपर बस मध्ये दिव्यांगांना आरक्षण मिळावे यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन तसेच राज्यात सध्या जास्त प्रमाणात चालणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या शिवाई (इलेक्ट्रिक) तसेच स्लीपर बस सेवेमध्ये दिव्यांग बांधवांसाठी आरक्षणाची कोणतीही स्पष्ट तरतूद नसल्यामुळे त्यांना प्रवासात खूप अडवाणी येत होत्या यासाठी डॉ. संतोष मुंडे यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची प्रत्यक्ष भेट घेवून या सर्व बसेस मध्ये दिव्यांगांना हक्काचे आरक्षण मिळावे अशी मागणी करत निवेदन दिले. या मागणीची तात्काळ दखल घेत मंत्री सरनाईक यांनी संबंधित विभागाच्या व्यवस्थापकीय संचालकांना (चऊ) तात्काळ प्रस्ताव पाठविण्याचे आदेश दिले दूरध्वनीवरून आवश्यक त्या सूचना देत सकारात्मक पाऊले उचलण्याचे निर्देश दिले यावरून लवकरच दिव्यांगांचा प्रवास सुकर आणि समाधानी होईल यात कोणतीही शंका नाही.

कंत्राटी भरती मध्ये दिव्यांगांना आरक्षण देण्यात यावे यासाठी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना निवेदन

शासकीय व निमशासकीय विभागांमध्ये होणाऱ्या कंत्राटी भरती प्रक्रियेत दिव्यांगांना आरक्षणाचा लाभ मिळत नाही हे आरक्षण प्रभावीपणे मिळावे यासाठी डॉ.संतोष मुंडे यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आरक्षण मागणीचे निवेदन दिले. या मागणीवर मंत्री आबिटकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत भरती प्रक्रियेत दिव्यांगांना त्यांचा आरक्षण हक्क मिळवून देण्याचे आश्वासन दिले. महाराष्ट्र राज्याचे माजी कृषिमंत्री आ.धनंजय मुंडे तसेच मा.ना.पंकजाताई मुंडे व दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे मंत्री ना.अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांगांच्या कल्याणासाठी प्रत्येक क्षणी प्रथम प्राधान्याने प्रयत्न करणारे तसेच विविध सामाजिक कार्यात सातत्याने अग्रेसर राहून विविध आरोग्य शिबिरे व दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबवणारे प्रसंगी दिव्यांगाच्या न्याय व हक्कासाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करणारे, दिव्यांगांचे कैवारी अशी ओळख असणारे दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान राज्याचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांनी राज्यातील दिव्यांगांच्या मागण्यांसाठी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्यभरातील दिव्यांग बांधवांमध्ये अतिशय आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

cmyk



# सातबारा कोरा झालाच पाहिजे, राजू शेट्टींचा मुख्यमंत्र्यांना इशारा





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झालाच पाहिजे. यासाठी परदेशी अहवाल आणा किंवा आंतरदेशीय अहवाल आणा पण सातबारा कोरा करा असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी दिला आहे. तसेच शक्तीपीठ महामार्ग हा २०२९ निवडणुकीमध्ये निधी उभा करण्यासाठी सुरु असलेला भ्रष्टाचार आहे, असे म्हणत नवीन शक्तीपीठ महामार्गालाही राजू शेट्टींनी विरोध दर्शवला आहे. शेतकऱ्यांना सध्या जून महिन्याची वाट असून मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शेतकऱ्याचा सातबारा कोरा झालाच पाहिजे यासाठी परदेशी अहवाल आणा किंवा आंतरदेशीय अहवाल ठाणा पण सातबारा कोरा करा असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी दिला आहे. कर्जमाफी वरील प्रवीण परदेशी यांच्या अहवालावर राजू शेट्टी यांनी खास शैलीत हा इशारा दिला आहे. शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांनी विरोध केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी नवीन मार्गाची घोषणा केली आहे, पण या नवीन मार्गालाही आमचा विरोधच असून आम्ही जागा देणार नाही असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे.

शक्तीपीठ महामार्गासाठी एक लाख कोटीचे कर्ज महाराष्ट्रावर येणार असून याचा खर्च फक्त चाळीस हजार कोटी आहे. वरचे साठ हजार कोटी रुपये हे २०२९ च्या निवडणुकांसाठी निधी उभा करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोपही राजू शेट्टी यांनी केला. आधीच महाराष्ट्रावर नऊ लाख कोटीचे कर्ज असून कोणाच्या निवडणूक निधीसाठी आम्ही हा महामार्ग होऊ देणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. वास्तविक याच महामार्गाला नागपूर रत्नागिरी हा दुसरा महामार्ग बनविण्यात आला आहे. या महामार्गावर केंद्र सरकारने प्रतिसाठ किलोमीटर टूल बसवले असून यातून रोज ४० लाख रुपयाचे उत्पन्न अपेक्षित होते मात्र येथून रोज फक्त आठ ते नऊ लाख रुपये एवढा टोल मिळत असल्याने येथील वाहतूक केवळ पंचवीस टक्के एवढीच असल्याचे शेट्टी यांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे पहिल्याच मार्गावरून वाहतूक नसताना शक्तीपीठ महामार्गाची गरज नसल्याचे शेट्टी यांनी सांगितले आहे. त्यामुळे संयुक्त मोजणीला अधिकारी आल्यास शेतकऱ्याच्या परवानगीशिवाय मोजणी होणार नसल्याचा इशाराही राजू शेट्टी यांनी दिला आहे. शक्तिपीठ महामार्गाला कोल्हापूर भागातून झालेल्या विरोधानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मार्गाची संपूर्ण अलाइनमेंट बदलून नवीन मार्ग बनविला होता. मात्र आता राजू शेट्टी यांनी या मार्गासही विरोध करण्यास सुरुवात केली आहे.

## बदलत्या हवामानात पशुधनाची काळजी

# कडुनिंबाचा प्रभावी वापर



यंदाच्या वर्षी उष्णतेत मोठी वाढ झाली आहे. विदर्भ मराठवाड्यात तरी तापमान ४५ अंशांपर्यंत पोहचले आहे. माणसाला नाकीनऊ करून सोडणाऱ्या या उष्णतेचा पशुधनावर देखील परिणाम होऊ शकतो. त्यामुळे उन्हाळयात तुमच्या पशुधनाची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा याचा परिणाम आपल्या दुग्धव्यवसायावर होऊ शकतो.

ह्या गोष्टी लक्षात ठेवा : जनावरांना सावलीत बांधावे आणि पिण्यासाठी थंड व स्वच्छ पाण्याचा पूरवठा करावा. पशुधनाकडून सकाळी ११ ते दूपारी ४ यादरम्यान काम करून घेऊ नये. उष्णतेपासून पशूधनाचे संरक्षण करण्यासाठी गोठ्याच्या छतावर गवताचे आच्छादन करावे. पशुधनाचे शेड पत्र्याचे किंवा सिमेंटचे असल्यास त्याला पांढरा रंग द्यावा. पशुधनास मूबलक प्रमाणात हिरवा चारा, प्रथिनेयूक्त, खनिजमिश्रण आणि मिठयूक्त खाद्य द्यावे. तिव्र उष्णतेच्या काळात पशुधनाच्या अंगावर पाणी शिंपडावे किंवा त्यांना पाणोठ्यावर न्यावे. पशुधनास सकाळी किंवा सायंकाळी चारावयास सोडावे. वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि.मी.) राहून तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्यामुळे, जनावरांना उघडयावर सोडू किंवा बांधू नये. निवाऱ्याच्या ठिकाणी बांधावे व पावसात भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. पशूधनास खुले पाणी, तलाव किंवा नदीपासून दूर ठेवावे, ट्रक्टर आणि इतर धातूंच्या शेती अवजारांपासून दूर ठेवावे व पशुधनास झाडाखाली जमा होऊ देऊ नये. पाऊस चालू होण्याच्या वेळी झाडाच्या आडोशाला थांबु नये.कडुनिंबाबाचा प्रभावी वापर : पशुधनातील उत्पादनवाढीसाठी त्यांना होणारा गोचीड, गोमाशा, उवा, पिसवा यांचा प्रादूर्भाव कमी करणे आवश्यक आहे. यासाठी उन्हाळा ऋतूमध्ये कडू निंबाच्या वृक्षाच्या पूर्ण पिकून खाली पडलेल्या निंबोळ्या गोळा करून सावली मध्ये वाळवून साठवून ठेवाव्यात व दर महिन्यामध्ये एकवेळ ५% निंबोळी अर्क करून पशुधनास फवारावे.

# हळद लागवडीसाठी जमिनीची पूर्वतयारी कशी करावी?

हळदीला देशामध्ये आणि देशांतर्गत निर्यातीसाठी मोठी मागणी आहे. हळदीची लागवडही मागील काही वर्षात वाढली आहे. त्यामुळे चांगले उत्पादन आणि दर्जेदार कंद मिळवण्यासाठी लागवडीपूर्वीची तयारी आणि मशागत योग्य पद्धतीने करणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य जमिनीची निवड, माती परीक्षण आणि व्यवस्थित मशागत केल्यास हळदीचे उत्पादन वाढू शकते.

हळदीसाठी माती कशी असावी?

सर्वप्रथम हळद लागवडीसाठी मध्यम ते कसदार, काळी आणि पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन निवडावी. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ दरम्यान असावा. जमिनीची खोली किमान २० ते २५ सें.मी. असावी, कारण हळदीचे कंद जमिनीत खोल वाढतात.

सेंद्रिय कर्बाचे प्रमाण ०.५ टक्क्यांपेक्षा जास्त असेल तर जमिनीची सुपीकता वाढते आणि पिकाला पोषक अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. पाणी साचणारी, खूप चिकण किंवा क्षारयुक्त जमीन टाळावी, कारण अशा जमिनीत कंद पोसत नाहीत आणि कंदकुज रोगाचा धोका वाढतो. माती परीक्षण ठरेल फायदेशीर : लागवडीपूर्वी माती परीक्षण करणे खूप गरजेचे आहे. माती परीक्षणामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांचे प्रमाण कळते आणि त्यानुसार खतांचे नियोजन करता येते. अन्नद्रव्ये जास्त असलेल्या जमिनीत फक्त पानांची वाढ होते, पण कंद लहान राहतात, त्यामुळे संतुलित खत व्यवस्थापन आवश्यक आहे. जमिनीची मशागत कशी करावी? मशागतीत पहिल्यांदा जमिनीची २५ ते ३० सें.मी. खोल नांगरणी करावी. यासाठी सबसोईलर किंवा तव्याचा नांगरही वापरु शकतात.

यामुळे जमिनीतील कडक थर तुटतो आणि मुळे चांगली वाढतात. नांगरणीनंतर शेतातील तण, गवत आणि जुनी मुळे काढून टाकावीत. पहिल्या नांगरटीनंतर १ ते २ महिन्यांनी दुसरी आडवी नांगरणी करावी. मोठी ढेकळे असल्यास कुळवणी करून जमीन भुसभुशीत करावी. यानंतर हेक्टरी ३५ ते ४० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. शेणखत उपलब्ध नसल्यास कंपोस्ट, गांडूळ खत किंवा घन स्वरुपात असलेले जिवामृत वापरता येते. यामुळे जमिनीचा पोत सुधारतो आणि ओलावा टिकून राहतो.

लागवडीसाठी बेड/रुंद वरंबा पद्धत : लागवडीसाठी रुंद वरंबा पद्धत फायदेशीर ठरते. म्हणजेच बेड पद्धत. विशेषतः ठिबक सिंचन असेल तर १२० सें.मी. अंतरावर सऱ्या पाडून २० ते ३० सें.मी. उंच वरंबे तयार करावेत. वरंब्याचा माथा सपाट करून ३० बाय ३० सें.मी. अंतरावर लागवड करावी.

लागवडीच्या वेळी हळदीचे गड्डे पूर्ण झाकले जातील याची काळजी घ्यावी. एका गादीवाफ्यावर दोन ओळी बसवाव्यात. या पद्धतीसाठी जमीन समपातळीची असणे गरजेचे असते.

# खरीप हंगामाचे नियोजन – पूर्वतयारी



खरीप हंगाम जवळ येतोय,त्या दृष्टीन शेतकरी तयारीला लागले असतीलच. खरीप हंगामाची उत्पादकता वाढविण्यासाठी पेरणीची पूर्वतयारी आणि पिकाचे नियोजन करणे महत्वाचे ठरते. पेरणीची वेळ साधायची असेल तर पूर्वतयारी आवश्यक आहे. पेरणी साधली की शेतकऱ्याने अर्धी लढाई जिंकलीच म्हणून समजा. खरीप हंगामाची पूर्वतयारी किंवा नियोजनात प्रामुख्याने आपल्याकडे उपलब्ध असलेली जमिन, तीची खोली, हवामान, पाण्याची उपलब्धतता या बाबींचा विचार करून कोणती पिके घ्यावयाची आहेत हे ठरवून त्याप्रमाणे सुधारित जातींच्या बियाणांची खरेदी, जीवाणू संवर्धने पिकासाठी लागणाऱ्या रासायनिक खतांची व्यवस्था, पिकांवरील संभाव्य कीड,रोगाच्या नियंत्रणासाठी कीटकनाशके, बुरशीनाशके, रोगनाशके यांची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

जमिनीच्या मशागतीसाठी लागणाऱ्या औजाराचे नियोजन :सर्वसाधारणपणे खरीप हंगामाचा कालावधी जून ते सप्टेंबर पर्यंत असतो, त्यामुळे या कालावधीत पिकांच्या पेरणीपासून ते काढणी-मळणी पर्यंतची कामे केली जातात.त्यासाठी शेतकऱ्यांनी खरीप हंगाम सुरु होण्यापूर्वी, हंगामासाठी लागणाऱ्या नांगर, कुळव, पाभर, रिजर, कोळपे, स्प्रे पंप व इतर औजारांची देखभाल केली पाहिजे. म्हणजे पेरणीच्या वेळेस अडचणी येत नाहीत व वेळीही वाचतो.त्यासाठी प्रत्येक वेळी मशागतीसाठी लागणाऱ्या औजाराचा वापर झाल्यानंतर, ते व्यवस्थित ठेवणे गरजेचे आहे.

मशागतीची कामे : खरीप पिकांच्या लागवडीची पूर्वतयारी म्हणून मशागतीच्या कामामध्ये नांगरट, ढेकळे फोडणे, कुळविणे, धसकट वेचणे, जमिनीचे सपाटीकरण करणे आणि सरी किंवा वाफे तयार करणे इत्यादी कामे करणे जरुरीचे आहे.

रानाची स्वच्छता : रान तयार करत असताना, स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून रानांच्या बांधावर असलेली, मशागतीस व पिकाच्या वाढीला अडथळा करणारी झुडपे तोडावीत.काही वेळा झाडाच्या बसल्यामुळे पिकांची वाढ होत नाही. तरी अशी झाडे काढून टाकावीत. तसेच बांधावरील गवत, काडीकचरा, झुडुपे कापून जाळावीत, त्यामुळे सूक्ष्म अवस्थेतील किडींचा आणि रोगांच्या बीजाणुंचा नाश होतो.

पिकाचे नियोजन :खरीप हंगामात लागवड करण्यासाठी, पिकांची निवड करतांना त्या पिकासाठी लागणारी जमिन, तिची उपलब्धतता, जमिनीचा प्रकार, खोली या गोष्टीचा विचार करूनच पिकांची निवड करावी, तसेच पिकांसाठी लागणाऱ्या पाण्याची उपलब्धतता या दोन गोष्टी प्रामुख्याने विचारात घ्याव्यात.

वाणांची (बियाणे) निवड आणि बीजप्रक्रिया : जमिन व पाण्याच्या उपलब्धतेनुसार कोणते पीक घ्यावयाचे ठरविल्यानंतर पिकांच्या वाणांची निवड करतांना, योग्य उत्पादन देणारे, कीड व रोगास कमी बळी पडणारे, कमी कालावधीत येणारे, अवर्षण प्रतिकारक्षम, शिफारस केलेल बियाणे निवडावे. कृषि विद्यापीठे, बियाणे महामंडळ यांनी प्रमाणित केलेलेच बियाणे वापरावे. सदरील बियाणे पेरणीपूर्वीच घेऊन ठेवावे. या बियाण्यांची उगवणशक्ती तपासलेली असते. त्यामुळे शिफारस प्रमाणित बियाणे वापरल्यास हेक्टरी रोपांची संख्या पाहिजे तेवढी ठेवता येते.स्वतःचे घरचे बियाणे वापरायाचे असल्यास अथवा इतर बियाणे वापरायचे असल्यास त्यांची आवणशक्ती तपासून पहावी तसेच पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे अत्यंत महत्वाचे आहे. बीजप्रक्रिया अतिशय साधी, सोपी आणि कमी खर्चाची पद्धत आहे.

जीवाणू खतांचा वापर :

रासायनिक खतांच्या तुलनेत, जीवनुखते अल्प किमतीत बाजारात मिळत असून, शेतकऱ्यांना परवडण्यासारखी आहेत. ही एक कमी पैशाची, जास्त फायदा करून देणारी जैविक खते आहेत. हवेतील नत्र, ही खते पिकांना उपलब्ध करून देणार या खतामुळे पिकांची वाढ जोमाने होते आणि उत्पादनातही वाढ होते. पेरणीपूर्वीच या खतांची तजवीज करून ठेवणे आवश्यक आहे.

प्रत्यक्ष पेरणी करतांना घ्यावयाची काळजी : शेतीची मशागत केल्यानंतर, योग्य बियाणांची निवड करून त्यांची योग्य अंतरावर आणि वेळेवर पेरणी करणे सुध्दा तितकच महत्वाचे आहे. योग्य अंतरावर पेरणी केली नाही तर तणांचा प्रादुर्भाव वाढतो आणि आंतरमशागतीस अडचणी निर्माण होतात. त्यासाठी निवडलेल्या पिकांची योग्य अंतरावर पेरणी करावी. पेरणी पाभारीने करावी. पेरणी करतांना बी जास्त खोलवर जाणार नाही, खूप दाट पडणार नाही याची काळजी घ्या.

हेक्टरी बियाणे : सर्वसाधारणपणे कोरडवाहू/ बागायत क्षेत्रातील पिकांच्या पेरणीकरिता बाजरीचे ३-४ किलो, खरीप ज्वारी १०-१२ किलो, मका १५-२० किलो, सूर्यफुलाचे ८ ते १० किलो, तुरीचे १२ किलो, उडीद, मुग, मटकी, हुलगा, चवळी या पिकांचे १५-२० किलो, भुईमुग १००-१२५ किलो ,सोयाबीन ७५-८०किलो बियाण्यांची आवश्यकता लागते.

खत व्यवस्थापन : आपण वर्षानुवर्ष त्याच जमिनीत, एकच पीक घेत असल्यामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांचा साठा दिवसेंदिवस कमी होऊन पिकांच्या उत्पादनात घट येत चालली आहे. पिकांचे चांगले उत्पादन घ्यावयाचे असेल तर जमिनीतील अन्नद्रव्यांचे प्रमाण योग्य ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी एकात्मिक खत व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पिकांसाठी शिफारस केल्याप्रमाणे पेरणीपूर्वी म्हणजे दुसऱ्या कुळविणेच्या वेळेस जमिनीत शेणखत/कंपोस्टखत मिसळणे आवश्यक आहे.खताची टंचाई, लिकिंग लक्षात घेता पेरणीपूर्वीच बाजारातून आवश्यक ती खते खरेदी करावीत, म्हणजे पेरणी करतांना खतांची अडचण भासणार नाही.

पिकाची पेरणी : वेळेवर पेरणी करणे अधिक उत्पादनाच्या दृष्टीने महत्वाचे असते, हंगामात पुरेसा पाऊस आला तरी,काही कारणास्तव पेरणीस उशीर झाल्यास उत्पादनात घट येते. तेव्हा अवर्षणप्रवण क्षेत्रात सर्वसाधारणपणे मोसमी पाऊस स्थिरावल्याबरोबर त्वरित पेरणी करावी.जूनचा दुसरा आठवडा ते जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत पावसाचा अंदाज घेऊन पेरणी करावी. अशा प्रकारे जमिनीत नांगरटीपासून ते पीक पेरणी पर्यंतची मशागत, बियाणे, रासायनिक तसेच जैविक खते, रोगनाशके, कीटकनाशके इत्यादींची खरेदी करून सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब पीक लागवडीसाठी केल्यास उत्पादनात निश्चितच भर पडेल.

खरीप पिकांची लागवडीच्या पूर्वतयारीची ठळक मुद्दे : शेतकऱ्यांनी आपल्याकडे उपलब्ध असलेली जमिन, त्यांची खोली, जमिनीचा प्रकार आणि पाण्याची उपलब्धतता याचा विचार करूनच पिकांची निवड करावी. खरीप हंगाम सुरु होण्यापूर्वी मशागतीसाठी लागणाऱ्या औजारची देखभाल/ दुरुस्ती करावी. जमिनीची नांगरट, कुळवणी, शेतातील तणे, धसकटे वेचणे, ढेकळे फोडणे, जमिन सपाटीकरण करणे, पाण्याचे पाट तासणे, वाफे तयार करणे इत्यादी कामे करावीत. पेरणीपूर्वी पिकांच्या योग्य वाणांची निवड आणि बीजप्रक्रिया करावी. पेरणी योग्य वेळी, योग्य अंतरावर आणि शिफारशीत बियाणे वापरावे. पिकांना शिफारशीप्रमाणे खत व्यस्थापन करावे, तत्पूर्वी माती परिक्षण घेणे आवश्यक आहे. खरीप हंगामासाठी लागणाऱ्या कृषि निविष्ठांची (बियाणे,जैविक/रासायनिक खते, कीटकनाशके) इत्यादींची हंगाम सुरु होण्यापूर्वीच तजवीज करून ठेवावी.




### महत्वाच्या घटना

१६०७ : ८० वर्षांचे युद्ध नेदरलँड्सने जिब्राल्टरजवळ स्पेनचे आरमार बुडवले.
१७९२ : क्लॉड जोसेफ रूगे दि लिलने फ्रेंच राष्ट्रगीतला मार्सेलची रचना केली.
१८२९ : चार्ल्स फ्रीमॅन्टल पश्चिम ऑस्ट्रेलियाला पोचला.
१८४६ : मेक्सिको व टेक्सासच्या प्रजासत्ताक मध्ये सीमावाद चिघळला. चकमकी सुरू.
१८५९ : प्रसिध्द सुएझ कालव्याच्या बांधकामास सुरुवात.
१८६२ : अमेरिकन यादवी युद्ध उत्तरेने न्यू ऑर्लिअन्स जिंकले.
१८६७ : दक्षिण आफ्रिकेत श्वेत लोकांना मतदान करण्याची अनुमती मिळाली.
१८९८ : अमेरिकेने स्पेनविरुद्ध युद्ध पुकारले.
१९०१ : अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्यात स्वयंचलित वाहनांना नंबरप्लेट लावणे सक्तीचे केले.
१९१५ : पहिले महायुद्ध ऑस्ट्रेलिया व न्यू झीलंडचे सैन्य तुर्कस्तानमध्ये उतरले.
१९२५ : जर्मन सैन्यदलाचे कमांडर जनरल आणि राजकारणी पॉल पॉल लुडविग हंस अँटोन फॉन बेनेकेंडोर्फ अंड वॉन हिंदेनबर्ग यांची राष्ट्रपती पदी नियुक्ती करण्यात आली होती.
१९२६ : ईराणमध्ये रझा शाह पहलवी सत्तेवर.
१९४५ : दुसरे महायुद्ध मिलानमधून नाझींची हकालपट्टी.
१९५३ : डी. एन. ए. रेणूचे अंतरंग उलगडून दाखवणारा वॉटसन आणि क्रीक यांचा शोधनिबंध नेचर मासिकात प्रकाशित झाला.
१९६६ : एका भूकंपामुळे ताश्कंद शहराचा मोठ्या प्रमाणावर विनाश झाला.
१९७४ : पोर्तुगालमध्ये जनतेचा उठाव. लोकशाही पुन्हा अमलात.
१९८२ : रंगीत दूरदर्शन प्रक्षेपणाला सुरुवात.
१९८३ : अंतराळयान पायोनियर १०सूर्यमालेच्या पलीकडे पोचले.
१९८६ : म्स्वाती तिसरा स्वाझीलँडच्या राजेपदी.
१९८९ : श्रीलंकेच्या संसदेने भारतीय वंशाच्या ३,३०,००० तमिळ जनतेला मताधिकार देण्याचा निर्णय घेतला.
२००० : वादग्रस्त आलमट्टी धरणाची उंची ५१९.६ मीटरपर्यंत वाढविण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिली.
२००५ : जपानच्या आमागासाकी शहराजवळ रेल्वे अपघात. १०७ ठार.
२००८ : जागतिक मलेरिया दिन
२००८ : हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध कलाकार, अभिनेते व चित्रपट दिग्दर्शक आमिर खान यांना चित्रपट क्षेत्रांतील आपल्या महत्वपूर्ण योगदानाकरता मास्टर दिनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.
२०१५ : ७.८ रिश्टर तीव्रतेच्या भूकंपामुळे नेपाळ देशात ९१०० जण मारले गेले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

३२ : मार्कस साल्व्हियस ओथो, रोमन सम्राट.
१२१४ : लुई नववा, फ्रांसचा राजा.
१२२८ : कॉन्राड दुसरा, जर्मनीचा राजा.
१२८४ : एडवर्ड दुसरा, इंग्लंडचा राजा.
१५४५ : यी सुन शिन, कोरियन दर्यासारंग.
१५९९ : ऑलिव्हर क्रॉमवेल, ब्रिटीश राजकारणी, अघोषित राजा.
१७४३ : मेवाड प्रांताचे शासक महाराजा महाराणा प्रताप सिंग द्वितीय यांचे पुत्र राजसिंग दुसरा यांचा जन्मदिन.
१७९४ : ब्रिटीशकालीन भारतातील हैदराबाद प्रांताचे रियासतदार(शासक) मुघल शासक मीर फर्कंदा अली खान उर्फ नासिर-उद-दौला यांचा जन्मदिन.
१८१९ : भारतातील जयपूर राज्याचे शासक महाराजा जय सिंह यांचा जन्मदिन.
१८७४ : गुग्लियेमो मार्कोनी, इटलीचा संशोधक, भौतिकशास्त्रज्ञ, रेडिओ संशोधक.
१९०० : प्रख्यात ब्रिटिश नागरी सेवक, मुत्सद्दी आणि राजकारणी तसेच संयुक्त राष्ट्र संघाचे माजी कार्यवाहक सरचिटणीस ह्युबर्ट माइल्स ग्लॅडविन जेब यांचा जन्मदिन.
१९०४ : भारतीय हिंदी साहित्यकार विद्वान चंद्रबली पाण्डेय यांचा जन्मदिन.
१९१२ : भारतीय तमिळ अभ्यासक व लेखक तसचं, तामिळनाडू येथील शैक्षणिक कर्ते म्यू. वरथराजन यांचा जन्मदिन.
१९१८ : हिंदी व मराठी चित्रपट अभिनेते शाहू मोडक यांचा जन्म. (मृत्यू: ११ मार्च १९९३)
१९१९ : साली काँग्रेस पक्षाचे नेता व उत्तर प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री हेमवती नंदन बहुगुणा यांचा जन्मदिन.
१९४० : हॉलिवूडमधील अभिनेता अल पचिनो यांचा जन्म.
१९६१ : अभिनेता, लेखक आणि दिग्दर्शक करण राझदान यांचा जन्म.
१९६१ : भारतीय-अमेरिकन पत्रकार आणि लेखक दिनेश डिसोझा यांचा जन्म.
१९६४ : भारतीय राजकारणी आर. पी. एन. सिंग यांचा जन्म.
१९६९ : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय व्यावसायिक फुटबॉल खेळाडू कालो हरीन यांचा जन्मदिन.
२००८ : जागतिक मलेरिया दिन

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११८५ : अंतोकु, जपानी सम्राट.
१२९५ : सांचो चौथा, कॅस्टिलचा राजा.
१६०५ : नरेस्वान, सयामचा राजा.
१६४४ : चाँगझेंग, चीनी सम्राट.
१७४० : थोरले बाजीराव पेशवे, मराठा साम्राज्याचे पेशवे.
१८४० : सिमिओन-डेनिस पोइसॉन, फ्रेंच गणितज्ञ.
१९९९ : साहित्यिक पंढरीनाथ रेगे यांचे निधन.
२००० : भारतीय चित्रपट गीतकार, पटकथा आणि कथा लेखक मुखराम शर्मा यांचे निधन.
२००२ : लाटव्हियाच्या योगशिक्षिका इंद्रा देवी यांचे निधन. (जन्म: १२ मे १८९९)
२००३ : ब्रिटिश शिल्पकार लिन चॅडविक यांचे निधन. (जन्म: २४ नोव्हेंबर १९१४)
२००५ : स्वामी रंगनाथानंद, भारतीय तत्त्वज्ञानी; अध्यक्ष, रामकृष्ण मिशन.

cmyk

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# पुर्णवादी बँकेत ८ कोटीचा घोटाळा ;ठेविदाराच्या झोपा उडाल्या

जालना। प्रतिनिधी

पुर्णवादी बँकेचा जालना शाखा व्यवस्थापक शिरिष देवळे याच्याशी संगनमत करून ८ कोटी १२ लाख ९३ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. विशेष म्हणजे शिरीष देवळे याने वरिष्ठ कार्यालयाची परवानगी न घेताच कर्ज प्रकरणांना मंजुरी दिली होती. याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश मधुकरराव कुलकर्णी (बीड) यांच्या फिर्यादीवरून कदीम जालना पोलीस ठाण्यात कुरंगळ आणि देवळे या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे. यासंदर्भात पोलीस सुत्रांनी दिलेली अधिक माहिती अशी की, जालन्यातील पंचमुखी वेअर हाऊसचा चालक रायचंद सखाराम कुरंगळ आणि जालना शाखा व्यवस्थापक शिरीष कमलाकर देवळे या दोघांनी संगनमताने दि. ४ जुन २०२५ ते १६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत पुर्णवादी जुना जालना परिसरातील ब्राम्हण सभा भवनात असलेल्या पुर्णवादी बँकेच्या शाखेत वेअर हाऊस पावतीच्या आधारे कर्ज सुविधा योजनेतून कर्ज वाटप करुन ही फसवणुक केली आहे.

या प्रकरणात बँकेने रायचंद कुरंगळ याच्याशी करारनामा केलेला असून, त्या करारनाम्यातील कलम क्र. ७ नुसार तारण ठेवलेल्या मालाची संपूर्ण जबाबदारी आरोपी कुरंगळ याची असल्याचे स्पष्टपणे नमूद आहे. त्याअनुषंगाने जालना शाखेमार्फत दि. ४ जुन २०२५ ते १६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत आरोपी कुरंगळ याने जारी केलेल्या वेअर हाऊस पावत्यांच्या आधारे शिरीष कमलाकर देवळे याने पदाचा गैरवापर करून एकुण ३२ कर्ज खाती मंजूर केली. त्यापैकी २४ कर्ज खाती आज अखेर प्रलंबित असल्यामुळे वरिष्ठ कार्यालयाने पडताळणीचे आदेश दिल्यानंतर शिरीष देवळे याने रायचंद कुरंगळ याच्यासोबत त्याच्या वेअर हाऊसला भेट




देऊन तारण माल उपलब्ध असल्याचे भासविणारी छायाचित्रे सादर केली. मात्र, त्यानंतर दि. २० एप्रिल २०२६ रोजी मुख्य कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या पंचमुखी वेअर हाऊसची प्रत्यक्ष पाहणी केली असता संबंधित तिन्ही गोडाऊनमध्ये तारण माल आढळून आला नाही. याबाबत रायचंद कुरंगळ आणि शिरिष

देवळे या दोघांकडून कोणतेही समाधान-कारक स्पष्टी-करण मिळाले नाही. त्यामुळे रायचंद कुरंगळ याने तारण मालाचा अपहार करुन विश्वासघात केला असून, शाखा व्यवस्थापक शिरीष देवळे याने कर्तव्यात कसूर आणि पदाचा गैरवापर करून रायचंद कुरंगळ यास सहकार्य केल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना समजले. या व्यवहारात बनावट वेअर हाऊस पावत्या तयार करून बँकेची ८ कोटी १२ लाख ९३ हजार ६४० रुपयाची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. महत्वाच्या कागदपत्रांमध्ये बनावटपणा केल्याचा तसेच तारण माल जागेवर नसल्यामुळे चोरीचा संशय निर्माण झाल्यामुळे पुर्णवादी बँकेचे बीड येथील मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश मधुकरराव कुलकर्णी (वय ५२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जिल्हा पो-जालना मर्चेंटस बँकेचा कर्मचारी पुर्णवादीत झाला शाखा व्यवस्थापक जालना मर्चटस् बँकेचा कर्मचारी असलेला शिरीष देवळे हा पुर्णवादी बँकेत शाखा व्यवस्थापक म्हणून रुजू झाला. त्याने सुरुवातीचे ७वर्ष चांगले काम केले, सगळ्यांचा विश्वास संपादन केला आणि त्यानंतर त्याने आपला रंग दाखवायला सुरुवात केली. बँकेच्या संचालक मंडळाची मान्यता न घेता त्याने तब्बल १० कोटींचे कर्ज रेवड्यासारखे वाटले. दररोजचे रतीब लावल्यासारखे त्याने एकेकाला लाखोंचे कर्ज वाटप केले. आणखी ३ कोटींच्या कर्ज वाटपाच्या फाईल त्याच्या हातावर होत्या. मात्र, बोगस कर्ज वाटप केल्याचा प्रकार उघडकीस आल्याने बँकेचे ३ कोटी रुपये वाचले आहेत. मुळात या प्रकरणात शिरीष देवळे जेव्हढा जबाबदार आहे तेव्हढेच पुर्णवादी बँकेतील महेश पारगावकर, राजेश कुलकर्णी आणि प्रल्हाद राजुरीकर हे देखील जबाबदार असल्याचे सांगण्यात येते. लीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांच्या आदेशान्वये आरोपी रायचंद कुरंगळ आणि शाखा व्यवस्थापक शिरीष देवळे या दोघांविरुद्ध कदीम जालना पोलीस ठाण्यात सी. आर. नं १६५/२६, कलम ३१६ (२), ३१८ (२), ३३६ (३), ३३८, ३४० (२), ६१ (२), ३ (५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास आर्थिक गुन्हेकडे वर्ग

## आरटीओ व महसूल पथकाची वाळू माफियाच्या १० विना नंबर वाहनावर कारवाई

जालना । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील पूर्णा नदीपात्रातून होणारी अवैध वाळू वाहतूक आणि विना नंबर प्लेट धावणाऱ्या हायवा वाहनांबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची दखल घेत, उप प्रादेशिक परिवहन विभाग व महसूल विभाग यांच्या संयुक्त पथकाने आज, दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी धडक कारवाई केली. या मोहिमेत विना नंबर प्लेट वाळू वाहतूक करणाऱ्या एकूण १० वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, संबंधितांकडून एकूण ६१,००० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मंठा शहरातून आणि मुख्य रस्त्यांवरून विना नंबर प्लेट असलेले हायवा ट्रक्स सुसाट वेगाने धावत असल्याच्या तक्रारी नागरिक व प्रसारमाध्यमांकडून करण्यात येत होत्या. या वाहनांचे क्रमांक जाणीवपूर्वक माती किंवा काळया ऑईलने झाकले



जात असल्याचे समोर आले होते. या गंभीर बाबीची दखल घेऊन उपविभागीय अधिकारी परतूर श्री पद्माकर गायकवाड व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. बालाजी धनवे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही विशेष मोहीम राबवली. ही कारवाई मंठा तहसीलदार श्रीमती सुमन मोरे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक भीमराज नागरे,चालक आसाराम घुले आणि भागवत परिस्कर यांच्या पथकाने केली. अवैध वाहतूक आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर यापुढेही सातत्याने कठोर कारवाई करण्यात येईल. सर्व वाहनधारकांनी रस्ते सुरक्षा नियम पाळावेत आणि नंबर प्लेट स्पष्ट ठेवावी, अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल.

## भूमीअभिलेख कार्यालयात चार अधिकारी चौकशीत दोषी ;संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी

### भालगाव येथील पांडुरंग घुले शेतजमिनीत अतिक्रमण आणि मोजणी फेरफार प्रकरण

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथील पीडित शेतकरी पांडुरंग मायनजी घुले व त्यांचे दोन मुलं हरी पांडुरंग घुले वसंत पांडुरंग घुले या बंधूंच्या शेतजमीन गट नंबर ४२४ ४२५ व ३९१ शेतजमिनीत (वहिवाट आणि बांध) सामनेवाले एकनाथ घुले यांच्यात शेतजमीनमोजणी वरून वाद आहे.

> पाथर्डी भूमिअभिलेख कार्यालयातील भ्रष्ट कर्मचारी निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी पीडित शेतकरी मायनजी घुले यांच्या शेत जमिनीतील गट नंबर ३९१ ४२४ व ४२५ मोजणीत फेरफार केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे शेत जमिनीतील हद्दीखुणा बदलल्या गेल्या अशी तक्रार आहे याची फेर पडताळणी केली आहे व पंचनामा पूर्ण केला आहे यानुसार वरिष्ठांकडे अहवाल सादर केला जाईल.
> (संदीप गोसावी – उपअधीक्षक भूमीअभिलेख कार्यालय नेवासा)

यासंदर्भात पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपअधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर सुनील साळवे यांच्या भ्रष्ट कारभारामुळे वसंत घुले आणि हरी घुले यांच्या शेतजमिनीमध्ये एकनाथ घुले यांनी वहिवाटीत अतिक्रमण केले असल्याची तक्रार थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती त्याअनुषंगाने बनावट दस्तावेज तयार करून मोजणीत फेरफार केल्याप्रकरणी पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन कर्मचारी निखिल मोरे व विद्यमान कर्मचारी दिनेश पुसदकर व सुनील सावळे यांचे निलंबन करण्याची मागणी आहे.

पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपाधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी लाखो रुपयांची आर्थिक देवाणघेवाण करून संगनमताने भालगाव येथील शेतकरी पांडुरंग मायनजी घुले त्यांचे मुलं वसंत घुले व हरी घुले यांच्या शेतजमीन गटनंबर ३९१ ४२४ व ४२५ जमीन मोजणीमध्ये २०/१२/२०२४ २०/०६/२०२५ तारखेला केलेल्या हद्दीखुणा २०/३/२०२६ रोजी केलेल्या हद्दीखुणा गट नंबर ३९१ मध्ये कायम मोजणी सीट व पोटहिस्सा यामध्ये सुद्धा प्रचंड तफावत जाणवत असल्याचे सिद्ध झाले आहे तसा पंचनामा पूर्ण केला आहे यामुळे मोरे पुसदकर व साळवे यांच्यावर निलंबनाच्या कार्यवाहीची अपेक्षा आहे.

## वै.नारायण महाराज पुण्यतिथीनिमित्त तारकेश्वर गडावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण

पाथर्डी । प्रतिनिधी

श्री क्षेत्र तारकेश्वर गडाचे संस्थापक वै. ह.भ.प.नारायण महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमानिमित्त महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महंत ह.भ.प.आदिनाथ महाराज शास्त्री यांनी नुकतेच निमंत्रण दिले आहे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांनी शुक्रवारी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत नारायण महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमानिमित्त येण्याचे निमंत्रण दिले आणि तारकेश्वर गडाच्या सामाजिक आध्यात्मिक व हिंदू रक्षक सेवादल व बजरंग दल यांच्या माध्यमातून हिंदू धर्म रक्षिता व गोमाता रक्षिता या विषयावर चर्चा केली तसेच तारकेश्वर गडावर चाललेल्या गो शाळेचे व गडाच्या तीर्थक्षेत्र विकासाच्या मुद्यावर चर्चा केली यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वारकरी संप्रदायाचे अलंकार असलेले नारायण महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमानिमित्त येणार असल्याचे सांगितले आहे.



## नामदेव लबडे यांचे दुःखद निधन

पाथर्डी । प्रतिनिधी



पाथर्डी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक व भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते नामदेव मामा लबडे (वय अंदाजे ६२) यांचे गुरुवारी दुःखद निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी मुलं मुली नातवंड असा मोठा परिवार आहे नामदेव लबडे यांना पाथर्डी तालुक्यात मामा या नावाने सर्वत्र ओळखत असत फुले शिव शाहू आंबेडकर समता विचारवादी असलेल्या नामदेव लबडे यांनी पाथर्डी नगरपरिषदेचे नगरसेवक पद भूषवले होते मितभाषी प्रांजळ स्वभावाचे नामदेव लबडे हे भाजप पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते व आमदार मोनिका राजळे यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जात होते नामदेव लबडे हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते त्यांच्या दुःखद निधनाने पाथर्डी तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनां नामांकित शाळेत प्रवेश घेण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, व लातूर या जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या मुला मुलींना इयत्ता पहिली (१ ) मध्ये शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेवु इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. अर्जासोबत अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत असावी. विद्यार्थी दारिद्र्य रेषेखालील असेल तर त्यासंबंधीत छायांकित प्रत व दारिद्र्य रेषा अनु क्रमांक नमुद करावा, पालकाची उत्पन्न मर्यादा ही १ लाख एवढी असुन यासाठी सक्षम अधिका-याने दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र देण्यात यावे. अर्जासोबत पालकांनी समंतीपत्रक देणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईजचे फोटो, जन्म तारखेचा पुरावा व वैद्यकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. या योजनेत आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांना तसेच विधवा, घटस्फोटीत, निराधार व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील पाल्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल विद्यार्थ्यांचे पालक शासकीय / निमशासकीय नोकरदार नसावेत प्रकल्प कार्यालयात प्रवेश अर्ज विनामुल्य उपलब्ध असुन दिनांक २५ ने २०२६ पर्यंत परिपुर्ण प्रवेश अर्ज जमा करणे आवश्यक आहे. या योजनेअंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांवर होणारा संपुर्ण खर्च आदिवासी विकास विभाग करणार आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, रिलायन्स मॉलच्या पाठीमागे, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षण विभागात संपर्क साधावा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या पाल्यास शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत प्रवेश घेण्याचे आवाहन छत्रपती संभाजीनगर,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे, प्रकल्प अधिकारी, यांनी केले आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा.एम.आर. सातव ७ वे सह दिवाणी न्यायाधिश व, रतर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ६६/२०२६**

**सरस्वती वि. निरंक**

अर्जदार : १ सरस्वती भ. राजाराम वळे वय ४६ वर्षे, धंदा घरकाम रा. तिरुपती नगर, बीड, ता. जि. बीड. २. श्रीकृष्णा पि राजाराम वळे, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. तिरुपती नगर, बीड, ता. जि. बीड. ३ ऋतुजा पि. राजाराम वळे, वय २५ वर्षे, धंदा शिक्षण, रा. तिरुपती नगर, बीड, ता. जि. बीड. ४ सुशिला भ्र. बाजीराव वळे, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. आनंदवाडी, ता. जि. बीड.

विरुध्द निरंक गैरअर्जदार

मागणी: वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत राजाराम पि. बाजीराव वळे तिरुपती नगर, बीड, ता. जि. बीड. यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी राजाराम पि. बाजीराव वळे यांचा मृत्यु दि. २४/११/२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय बीड येथे मयत झालेले असून अर्जदार मयत राजाराम पि. बाजीराव वळे यांचे नातेवाईक आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबदद्?ल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत राजाराम पि. बाजीराव वळे तिरुपती नगर, बीड यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याचीनोंद घ्यावी.

आज दिनांक २४ माहे ०४ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०८/०६/२०२६ आहे.

**आदेशावरुन**
**स्वाक्षरित**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज १४९/२०२६**

**विष्णुपंत व इतर विरुध्द निरंक**

**मार्फत अॅड. आर. एन. सानप**

अर्जदार :- १. विष्णुपंत पि. बाबुराव जायभाये, वय ७४ वर्षे, धंदा-शेती, २. देविदास पि. बाबुराव जायभाये, वय ६६ वर्षे, धंदा-शेती, ३. लोचनबाई भ्र. रावसाहेब नागरगोजे, वय ६८ वर्षे, धंदा-घरकाम, अर्जदार क. १ व २ रा. काकडहिरा पो. निरगुडी ता. पाटोदा जि. बीड. अर्जदार क. ३ रा. लिंबा (खांबा) ता. शिरुर का. जि. बीड

विरूध्द निरंक

मागणी अर्ज:-बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार क. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत बाबुराव पि. गणपती जायभाये यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी बाबुराव पि. गणपती जायभाये यांचा मृत्यु दिनांक २८/०३/२०२६ रोजी काकडहिरा ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगांकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत बाबुराव पि. गणपती जायभाये यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २२ जुन २०२६.

**आदेशावरुन**
**स्वाक्षरित**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा.**
**ता. पाटोदा, जि. बीड.**

स्वाक्षरित
क. लिपीक

## शेक्सपियरच्या साहित्यामध्ये मानवी जीवनाचे तत्वज्ञान -डॉ.रमाकांत निर्मळ

बीड। प्रतिनिधी

समाजातील चांगल्या वाईट घटनांची प्रतिबिंब साहित्यामधून दिसून येते. जगप्रसिद्ध नाटककार साहित्यिक विल्यम शेक्सपियर यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान प्रतिबिंबित होते असे प्रतिपादन इंग्रजी साहित्याचे अभ्यासक डॉ. रमाकांत निर्मळ यांनी केले.येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयामध्ये २३ एप्रिल जागतिक पुस्तक दिन आणि विल्यम शेक्सपियर यांचा या जन्मदिना निमित्त इंग्रजी विभाग आणि ग्रंथालय विभागाच्यावतीने ''इकोज्? ऑफ डुम कोअर थीम्स इन शेक्सपियर डार्क ट्रॅजेडीस '' या विषयावर आयोजित राष्ट्रीय वेबिनार मध्ये मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.



पुढे बोलताना डॉ.रमाकांत निर्मळ म्हणाले की, विल्यम शेक्सपियर यांनी लिहिलेले सर्व साहित्य मानवी भावनांना स्पर्श करणारे आहे. त्यांची कविता, नाटके समाजातील घटकांचे प्रतिनिधित्व करतात. शेक्सपियर यांच्या अथेल्लो, हॅम्लेट, म्यागबेथ, आणि किंग क्लियर या शोकांतिका मधील स्त्री - पुरुष पात्र आणि एकंदरीत नाटकातील शोकांतिका यावर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला. शेक्सपियर यांच्या नाटकातील नायक, खलनायक आणि नायिका त्यांच्या अभिनयातून लक्षवेधी ठरतात असे ते म्हणाले. समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की, शेक्सपियर जागतिक दर्जाचे लेखक आहेत. त्यांच्या साहित्यातील प्रसंग मानवी जीवनातील छटांना स्पर्श करणारे आहेत. त्यांच्या साहित्याचा संपूर्ण जगावर प्रभाव आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संगीता ससाने यांनी केले.परिचय उपप्राचार्य तथा इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ.शितल कांदे यांनी मानले. सदर वेबिनार यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य डॉ.रमेश खंडागळे, अधिष्ठाता डॉ. सोपान सुरवसे प्रा. संजय काळे, ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर, सचिन चौरे, यांनी परिश्रम घेतले.याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते ग्रंथालयात शेक्सपियर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेबिनारमध्ये साहित्याचे अभ्यासकयापक विद्यार्थी बहुसंख्येने सहभागी झाले होते.

# घाटनांदुर -श्रीगोंदा या रेल्वे मार्गासाठी रेल्वे बोर्डाचे सदस्य डॉ. आदित्य पतिकराव यांनी केली ४ हजार कोटीची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

एकीकडे वर्षानुवर्ष मागणी होत असलेल्या घाटनांदुर श्रीगोंदा या रेल्वे मार्गाच्या मागणी साठी बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी पूर्णपणे उदासीन असताना रेल्वे बोर्डाचे सदस्य व अंबाजोगाईचे भूमीपुत्र डॉक्टर आदित्य पतक राव हे मात्र या मार्गासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहे.

नुकतीच मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे संपन्न झालेल्या १२७ व्या विभागीय झोनल रेल्वे सल्लागार समितीच्या बैठकीत डॉ. आदित्य पतकराव यांनी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या घाटनांदूर-अंबाजोगाई-केज-मांजरसुंबा-पाटोदा-जामखेड-श्रीगोंदा या नवीन रेल्वे मार्गाचा प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मांडला. या महत्त्वपूर्ण बैठकीला अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे, रेल्वेचे सचिव मिश्रा यांच्या सह रेल्वे बोर्डाचे वरिष्ठ अधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. झोनल रेल्वे सल्लागार समितीच्या बैठकीत डॉ आदित्य पतकराव यांनी अनेक दशकांपासूनची घाटनांदुर श्रीगोंदा रेल्वे मार्गाची मागणी आता कागदावरून रुळावर आणा अशी मागणी करत या प्रकल्पाचा ऐतिहासिक धागा पकडून प्रशासनाचे लक्ष वेधले. ते म्हणाले, "२०१५-१६ च्या रेल्वे अर्थसंकल्पात तत्कालीन रेल्वे मंत्री श्री. सुरेश प्रभू यांनी या मार्गाची घोषणा केली होती आणि २०१६ मध्ये प्राथमिक सर्वेक्षणही पूर्ण झाले आहे. मात्र, गेली १० वर्षे हा प्रकल्प केवळ तांत्रिक कारणांमुळे लाल फितीत अडकला आहे. आता वेळ आली आहे की हा प्रकल्प कागदावरून



प्रत्यक्षात जमिनीवर उतरवण्याची." व त्या साठी केंद्र सरकारने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या रेल्वे पायाभूत सुविधांसाठी जो २३,९२६ कोटी एवढा ऐतिहासिक निधी मंजूर केला आहे यातील ३,५०० ते ४,००० कोटी रुपयाचा निधी या प्रकल्पासाठी वळवून, कामाची सुरुवात तातडीने करावी, अशी लेखी मागणी डॉ. पतकराव यांनी महाव्यवस्थापकांकडे केली आहे. डॉ. आदित्य पतकराव यांनी या मार्गाची गरज स्पष्ट करताना तीन प्रमुख मुद्दे प्रामुख्याने मांडले असून या मध्ये अंबाजोगाई आणि केज सारखी मोठी शहरे रेल्वेविना मागास राहिली आसल्याने हा मार्ग या भागाचा कायापालट करणारा ठरेल. या पट्ट्यातील शेतीमाल आणि स्थानिक व्यापाराला थेट मुंबई-पुण्यासारख्या महानगरांची बाजारपेठ उपलब्ध होईल.

आणि अंबाजोगाईचे योगेश्वरी देवी शक्तिपीठ आणि परळी वैजनाथ येथील ज्योतिर्लिंगाला येणाऱ्या लाखो भाविकांसाठी हा मार्ग जीवनवाहिनी ठरेल. या बैठकीत डॉ. पतकराव यांनी मांडलेल्या मुद्द्यांची दखल घेत, रेल्वे प्रशासनाकडून या प्रस्तावावर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

## बीड च्या गटशिक्षणाधिकारीपदी भगवान सोनवणे तर वडवणीच्या गटशिक्षणाधिकारी पदी राहूल भट्टी

बीड । प्रतिनिधी

जिल्हा तांत्रिक सेवेमधील

विस्ताराधिकारी या संवर्गातून शिक्षण सेवा गट ब प्रशासन शाखा मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम संवर्गातील रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरूपातआज दि. २४ एप्रिल २०२५ रोजी आदेश निर्गमित झाले आहेत या आदेशानुसार बीडच्या गटशिक्षणाधिकारी पदी भगवान सोनवणे यांची तर बडवणीच्या गटशिक्षणाधिकारी पदी राहुल भट्ट यांची नियुक्ती करण्यात आली आहे याच वेळी उपशिक्षणाधिकारी पदी संजय शिंदालकर व धनंजय शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या आदेशानुसार

धनंजय मारुतीराव बोंदार्डे (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जामखेड जिल्हा अहिल्यानगर ),भगवान सोपानराव सोनवणे (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती बीड),रंगनाथ नामदेव राऊत (विभागीय सहाय्यक सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ लातूर),धनंजय रामराव शिंदे (उपशिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद बीड) ,ऋषिकेश जनार्दन शेळके (अधीक्षक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक माध्यमिक हिंगोली ),मोहन त्रिंबक काकडे उपशिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद कोल्हापूर,नानाभाऊ गणपती हजारे उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद सातारा,हनुमान गहिनीनाथ गव्हाणे उपशिक्षणाधिकारी शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद जळगाव,श्रीमती हिना उमर अंसारी गटशिक्षणाधिकारी ◀◀ पान ३ वर

## धारूर-चौसाळा- बोरिवली नवीन गाडीचा शुभारंभ



चौसाळा । प्रतिनिधी

अनेक दिवसापासून येथील परिसरातील नागरिकांची नांदूर चौसाळा पाटोदा मार्गे बोरवली अशी गाडी सुरू करावी अशी मागणी होती त्या मागणीनुसार धारूर पुणे बोरवली नुकतीच सदर धारूर नांदूर चौसाळा पाटोदा पुणे पनवेल बोरवली अशी गाडी सुरू केली आहे धारूर चौसाळा बोरवली या गाडीच्या शुभारंभ प्रसंगी नाहुली येथील ज्ञानोबा शिंदे पत्रकार एनटी वाघमारे विकास सर्वज्ञ व चालक संदिपान गुंठे वाहक खांडवे इतरही गावातील प्रवाशी बहुसंख्येने होते याप्रसंगी खूप दिवसाच्या प्रतीक्षेने चौसाळा नांदूर घाट या भागातील प्रवाशांसाठी आनंदाची बातमी अशी की गेल्या ◀◀ पान ३ वर

## बोगस डॉक्टरांविरोधात कारवाईसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात बोगस डॉक्टरांच्या वाढत्या प्रमाणावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी आज माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक १६.३० ते १७.३० वा. दरम्यान संपन्न झाली. सदर बैठकीस अन्न व औषध प्रशासन विभाग बीड येथील मा. सहाय्यक आयुक्त, श्री. महादेव निमसे, आय.एम.ए. बीड. अध्यक्ष डॉ. अनंत मुळे, ग्राहक पंचायत अध्यक्ष बीड अशासकीय सदस्य प्राध्यापक आर.टी. गर्जे, श्री. शेख सिराज शेख आयुब अशासकीय सदस्य, पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) सदस्य सचिव श्री. उमाशंकर कस्तुरे तसेच मा. जिल्हा शल्यचिकित्सक, बीड, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद बीड, जिल्हा माहिती अधिकारी बीड, स्वमी रामानंदतिर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई, येथील प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान जिल्ह्यात कार्यरत असलेल्या बोगस डॉक्टरांविरोधात कठोर आणि समन्वयित कारवाई करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. माननीय जिल्हाधिकारी यांनी आरोग्य व पोलीस विभागाने संयुक्त पथके तयार करून तालुका स्तरावर विशेष तपासणी मोहीम राबवावी, तसेच बेकायदेशीर वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले.

यावेळी जिल्ह्यातील खासगी दवाखाने, क्लिनिक व औषध विक्रेत्यांची कागदपत्रे तपासण्यावर भर देण्यात आला. अधिकृत परवाना नसताना वैद्यकीय सेवा देणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी जनजागृती मोहीम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरिकांनीही संशयास्पद वैद्यकीय व्यवसायाची माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहन करण्यात आले. बीड जिल्ह्यात आरोग्य सेवा अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## ग्रामीण आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी 'माझे गाव,आरोग्यसंपन्न गाव' मोहिमेत सहभागी व्हा!

### डॉ.शिवानी बोडखे आणि डॉ. अमान बेग यांचे ग्रामस्थांना आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि ग्रामस्थांमध्ये आरोग्याविषयी व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी शासनाच्या वतीने 'माझे गाव, आरोग्यसंपन्न गाव' ही महत्त्वाकांक्षी योजना राबविली जात आहे. गावाचे आरोग्यमान उंचावणाऱ्या या लोकचळवळीत प्रत्येक ग्रामस्थाने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन कडा प्राथमिक आरोग्य



केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी बोडखे आणि वैद्यकीय अधिकारी डॉ. अमान बेग यांनी केले आहे.

महाराष्ट्रात विविध टप्प्यांवर आरोग्य विभाग आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून या मोहिमेला गती दिली जात आहे. या योजनेचा मुख्य उद्देश केवळ आजारांवर उपचार करणे हा नसून, आजार होऊच नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देणे हा आहे. गावातील प्रत्येक नागरिकाला वैयक्तिक स्वच्छता आणि आरोग्याचे महत्त्व पटवून देत जागरूक करणे. डेंग्यू, मलेरिया यांसारख्या संसर्गजन्य तसेच मधुमेह आणि उच्च रक्तदाब यांसारख्या असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे. माता मृत्यू आणि बाल मृत्यूचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी विशेष प्रयत्न करणे. ◀◀ पान ३ वर

## आदित्य इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची चार्जिंग स्टेशनला भेट

### पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड, विद्यार्थ्यांनी अनुभवली भविष्यातील 'इलेक्ट्रिक क्रांती', ई-बसचे तंत्रज्ञान; बॅटरी चार्जिंग आणि एसी सिस्टीमचा घेतला प्रत्यक्ष अनुभव

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य एज्युकेशन ग्रुप संचलित आदित्य इंजिनिअरिंग कॉलेजच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. इमामपूर रोडवरील ई-व्हीकल चार्जिंग स्टेशनला भेट देऊन विद्यार्थ्यांनी बॅटरी चार्जिंग तंत्रज्ञान आणि ई-बसच्या कार्यप्रणालीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. या भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड



मिळाली. विद्यार्थ्यांनी भविष्यातील 'इलेक्ट्रिक क्रांती चा अनुभव घेतला. ई-बसचे तंत्रज्ञान,बॅटरी चार्जिंग आणि एसी सिस्टीमची प्रत्यक्ष माहिती घेतली.

ही औद्योगिक भेट आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा आणि संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी संपन्न झाली. द्वितीय, तृतीय आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी या भेटीत सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी चार्जिंग स्टेशनचे डेपो मॅनेजर बाळू जगताप यांनी विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक वाहनांची कार्यप्रणाली, चार्जिंग प्रक्रिया आणि बॅटरी सिस्टीमची सविस्तर माहिती दिली. विशेषतः ई-बसमध्ये वापरले जाणारे एसी कूलिंग ◀◀ पान ३ वर

## एनसीआरटीच्या पुस्तकात मराठा साम्राज्याचा नकाशा चुकीचा

### खा.सोनवणे यांचे केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना पत्र; नकाशात बदल करून ऐतिहासिक सत्याची मोडतोड थांबवण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

एनसीआरटीच्या इयत्ता ८ वीच्या इतिहास पुस्तकात मराठा साम्राज्याच्या नकाशात करण्यात आलेले बदल अत्यंत गंभीर असून, हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा आणि देशाच्या गौरवशाली इतिहासाचा अवमान आहे. हा चुकीचा नकाशा तत्काळ दुरुस्त करून ऐतिहासिकदृष्ट्या अचूक नकाशा प्रसिद्ध करावा, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्र लिहले आहे.

खा.सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेले मराठा साम्राज्य हा भारतीय इतिहासातील एक सुवर्णकाळ आहे. पेशव्यांच्या काळात या साम्राज्याचा विस्तार भारतीय उपखंडातील विस्तीर्ण भागापर्यंत झाला होता. अटकेपार झेंडे फडकवणाऱ्या मराठ्यांच्या शौर्याचा इतिहास जगजाहीर आहे. मात्र, एनसीआरटीच्या नवीन पुस्तकात मराठा साम्राज्याचा विस्तार आणि प्रभाव अत्यंत



कमी करून दाखवण्यात आला आहे. हा प्रकार इतिहासाची मोडतोड करणारा आणि सत्याचा अपलाप करणारा आहे. इतिहासाच्या पुस्तकातील या चुकीच्या बदलामुळे महाराष्ट्र राज्यात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ऐतिहासिक तथ्यांशी छेडछाड करून नव्या पिढीसमोर चुकीचा इतिहास मांडला जात असल्याची भावना जनसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे. या विषयावर राज्यभरातून संताप व्यक्त होत असतानाच खा. सोनवणे यांनी थेट केंद्राकडे धाव घेत या प्रकरणाची दखल घेण्यास भाग पाडले आहे.

एनसीआरटीने या नकाशात बदल का केला, याचे अधिकृत आणि स्पष्टीकरण सरकारने द्यावे, ऐतिहासिकदृष्ट्या योग्य आणि प्रमाणिक नकाशा पुन्हा पुस्तकात समाविष्ट करण्यात यावा, मराठा साम्राज्याचा गौरवशाली इतिहास कमी लेखण्याचा प्रयत्न थांबवावा आदि मागण्याही करण्यात आल्या आहेत.

मराठा साम्राज्याचा विस्तार हा केवळ भौगोलिक नव्हता, तर तो आमच्या अस्मितेचा विषय आहे. एनसीआरटीसारख्या जबाबदार संस्थेने चुकीचा नकाशा देऊन इतिहासाशी अन्याय करू नये. शिक्षण मंत्र्यांनी या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन दुरुस्तीचे आदेश द्यावेत, अन्यथा हा विषय अधिक तीव्रतेने मांडला जाईल.

-खा.बजरंग सोनवणे, लोकसभा सदस्य, बीड

## आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून भारतीयांना लोकशाही बहाल केली:पप्पू कागदे

बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशभरात होणाऱ्या शोषण मुक्तीसाठी लढा उभारुन शोषित, पीडित, उपेक्षित, समाज बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व उपेक्षितांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी भारतीय संविधानाची निर्मिती करून प्रत्येकांना स्वातंत्रपणे जगण्याचा अधिकार मिळवून दिला.हजारो वर्षाची गुलामगिरी नष्ट करून उपेक्षितांना ताठ मानेने उभे करण्यासाठी भारतीय संविधान देशाला अर्पण



करून लोकशाही बहाल केली. असे प्रतिपादन युवा प्रदेश अध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंती प्रसंगी घाटसावळी पारगाव (सिरस) या गावी केले.

पुढे बोलताना पप्पू कागदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब ◀◀ पान ३ वर

## चिंचाळा येथे अवैध दारू विक्री विरोधात तक्रार ऑल इंडिया पँथर सेनेचा आंदोलनाचा इशारा

वडवणी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा गावात अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ऑल इंडिया पँथर सेनेचे तालुका अध्यक्ष त्रिंबक पायके यांनी बुधवारी वडवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना लेखी निवेदन देऊन तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. निवेदनानुसार, गावात अंदाजे नऊ ते दहा ठिकाणी खुलेआम अवैध दारूची विक्री केली जात आहे. यातील काही दुकाने जिल्हा परिषद शाळेजवळ असल्याने विद्यार्थ्यांवर व नागरिकांवर विपरीत




परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.


गावात दारू विक्रीमुळे भांडणे, वाद-विवाद आणि गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. यामुळे परिसरातील शांतता व सुरक्षितता धोक्यात येत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित दुकाने त्वरित बंद करून दोषींवर कठोर ◀◀ पान ३ वर

## बीड शहरासाठी शववाहिका दुरुस्त करून लवकरच सेवेत -शेख निजाम

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. बीड नगरपालिका प्रशासन व स्वच्छता व आरोग्य सभापती निजाम शेख यांच्या सूचनेवरून शहरातील बंद पडलेली शववाहिका दुरुस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, लवकरच ती नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शहरात आपत्कालीन परिस्थितीत किंवा दुःखद प्रसंगी शववाहिकेची अत्यंत गरज भासते. मात्र, मागील काही काळापासून तांत्रिक बिघाडामुळे ही सेवा खंडित झाली होती. त्यामुळे नागरिकांना



खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत होता, ज्यामुळे आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन स्वच्छता व आरोग्य सभापती निजाम शेख यांनी तात्काळ दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना शववाहिका त्वरित दुरुस्त करून सेवा सुरू करण्याच्या सूचना दिल्या. नगरपालिका प्रशासनानेही या सूचनेला सकारात्मक प्रतिसाद देत दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घेतले आहे.

तसेच, बीड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पालकमंत्री सुनेत्राताई पवार आमदार विजय सिंह पंडित, यांच्या मार्गदर्शनात नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे, उपाध्यक्ष विनोद मुळूक, तसेच नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब भाई हे सर्व लोकप्रतिनिधी कटिबद्ध असून, नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. यावेळी नगरसेवक शेख माज्जेद, स्वच्छता निरीक्षक भागवत जाधव साहेब, तसेच कर्मचारी पप्पू साळवे व जावेद खान आदी सर्व कर्मचारी उपस्थित होते. लवकरच ही शववाहिका अत्याधुनिक सुविधांसह सज्ज होऊन बीड शहरातील नागरिकांच्या सेवेत दाखल होणार असल्याची माहिती मिळाली आहे. या निर्णयामुळे शहरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, गरजूंना मोठा दिलासा मिळणार आहे.

**नागरिकांच्या सेवेसाठी कटिबद्ध**

निजाम शेख यांनी सांगितले की, बीड शहरातील नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी नगरपालिका प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. शववाहिका सेवा लवकरात लवकर सुरू करून नागरिकांना दिलासा देण्याचा आमचा प्रयत्न आहे. शहराच्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# दिलासादायक! अखेर उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्यास सुरुवात, नदीकाठच्या गावांची तहान भागणार

पुणे । प्रतिनिधी

शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. अखेर उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या नऊ दिवसांपासून आलेगाव येथे कोरड्या पडलेल्या भीमा नदीपात्रात सुरू असलेले आंदोलन आज संपल्यानंतर संध्याकाळी सहा वाजता पॉवर हाऊस साठी १६०० आणि भीमा नदीत १४०० क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे.

गेले नऊ दिवसापासून भीमा नदीपात्रात सुरु होतं आंदोलन

आलेगाव येथे गेले नऊ दिवसापासून कोरड्या पडलेल्या भीमा नदीपात्रात सुरू असलेले आंदोलन आज संपल्यानंतर संध्याकाळी सहा वाजता पॉवर हाऊस साठी सोळाशे आणि भीमा नदीत चौदाशे क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्यास सुरुवात झालेली आहे. काल रात्री पालक मंत्री जयकुमार गोरे यांच्या



आदेशानंतर हे पाणी सोडण्यात येणार होते. मात्र आलेगाव येथे गेले नऊ दिवसापासून भीमा नदीपात्रात सुरू असलेल्या आंदोलनामुळे काल हे पाणी सोडता आले नव्हते. आज अखेर पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आंदोलकांची समजूत घातल्यानंतर कमी प्रमाणात पाणी सोडण्याची मागणी मान्य केली आहे.

प्रशासनाने सहा हजार क्युसेक ऐवजी ३००० क्युसेक विसर्गाने पाणी सोडले

आज भीमा नदी मध्ये उजनी धरणातून एकूण सहा हजार क्युसेक निसर्गाने पाणी सोडण्यात येणार होते ते कमी करून आता ३००० क्युसेक विसर्गने पाणी सोडण्यास सुरुवात झालेली आहे. आमच्या भागात जास्त क्षमतेने पाणी सोडल्यास थांबणार नाही अशी मागणी या ग्रामस्थांची असल्याने अखेर प्रशासनाने सहा हजार क्युसेक ऐवजी ३००० क्युसेक विसर्गाने उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्यास सुरुवात केली आहे. हळूहळू आता पाण्याचा विसर्ग येत्या काही दिवसात वाढवण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यात भीमा नदी पात्र कोरडे पडल्यामुळे पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. परिणामी पिके सुकू लागल्याने उजनी धरणातून तातडीने पाणी सोडण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. शेतकऱ्यांनी पाणी सोडावं या मागणीसाठी आंदोलन सुरु केले होते. पिकांना पाणी मिळत नसल्यामुळे ती जळून जाण्याची भीती व्यक्त होत होती. याशिवाय जनावरांसाठी लागणारे पाणी तसेच नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळं नागरिक देखील आक्रमक होताना दिसत आहेत. अशातच काल पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी भीमा नदीत पाण्या सोडण्यासंदर्भात सूचना दिल्या होत्या. आज अखेर भीमा नदीत पाणी सोडण्यात आलं आहे.

# पुण्यात अवैध धंदेवाल्यांशी 'सेटिंग' करणाऱ्या दोन पोलिसांचे निलंबन

पुणे शहरात अवैध धंद्यांवर कठोर कारवाईचे आदेश असतानाच पोलीस दलातीलच दोन कर्मचाऱ्यांनी अवैध धंदेवाल्यांना थेट प्रोत्साहन दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.




या प्रकरणी सहकारनगर पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस फौजदार आणि हवालदाराला तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. ही कारवाई अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पोलीस उप आयुक्त मिलिंद मोहिते यांनी निलंबनाचे आदेश दिले.

निलंबित करण्यात आलेल्यांमध्ये सहायक पोलीस फौजदार बापुसाहेब किसनराव खुटवड आणि हवालदार अमोल प्रकाश पवार यांचा समावेश आहे. दोघेही सहकारनगर पोलीस ठाण्याच्या तपास पथकात (डीबी) कार्यरत होते. मार्च २०२६ मध्ये अवैध धंदा चालवणाऱ्या व्यक्तीकडून पैसे स्वीकारताना दोघांचा व्हिडिओ व्हायरल झाला. या व्हिडिओनंतर विभागीय चौकशी करण्यात आली. चौकशीत कर्तव्यावर असताना अवैध धंदेवाल्यांशी संपर्क ठेवणे, आर्थिक व्यवहार करणे आणि त्या धंद्यांना प्रोत्साहन देणे हे गंभीर गैरवर्तन सिद्ध झाले.दोघांविरुद्ध मुंबई पोलीस (शिक्षा व अपिले) नियम १९५६ तसेच मुंबई पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत कारवाई करण्यात आली असून, त्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे.

या घटनेनंतर सहकारनगर पोलीस ठाण्याच्या तपास पथकावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. घेतलेले पैसे इतर वरिष्ठांपर्यंत पोहोचले का? या वसुलीमागे कोणाचा वरदहस्त होता? अवैध धंद्यांचा 'सेटिंग' किती दिवसांपासून सुरू होते? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप अस्पष्ट आहेत. शहरात अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाईचे आदेश असतानाच पोलीस दलातील कर्मचाऱ्यांकडूनच गैरप्रकार घडल्याने संपूर्ण यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# पुण्यात सायबर फसवणूक; गुंतवणुकीच्या नावाखाली महिलेची ५२ लाखांची फसवणूक

पुणे: कमी गुंतवणुकीवर जादा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी महिलेला तब्बल ५२ लाख ७२ हजारांना ऑनलाईन गंडा घातला आहे. ही घटना ३० जानेवारी ते २ एप्रिल २०२६ कालावधीत नऱ्हेत घडली आहे. याप्रकरणी ४६ वर्षीय महिलेने साबयर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार मोबाईलधारक, लिंकधारकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार महिला नऱ्हेत राहायला असून, ३० जानेवारीला सायबर चोरट्यांनी त्यांना व्हॉट्सपद्वारे जाहिरात पाठवली होती. त्यामध्ये कमीत कमी गुंतवणुकीवर जादा नफा



मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर सायबर चोरट्याने महिलेला लिंक पाठवून डाऊनलोड करण्यास सांगितले. सुरुवातीला कमी गुंतवणुकीवर जादा नफा झाल्याचे दाखवून सायबर चोरट्यांनी महिलेचा विश्वास संपादित केला. त्यानंतर त्यांच्याकडून ५२ लाख ७२ हजार रुपये वर्ग करून घेतले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने सायबर पोलिस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्वप्नाली शिंदे तपास करत आहेत.

तरुणाला २२ लाखांचा गंडा

गुंतवणुकीच्या आमिषाने तरुणाची २२ लाखांची फसवणूक जडेजा बदर्समध्ये गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्यांनी तरुणाचा विश्वास संपादित केला. त्यानंतर त्यांना पैसे पाठवण्यास भाग पाडून तब्बल २१ लाख ७१ हजारांना ऑनलाईन गंडा घातला. ही घटना १५ जून २०२५ ते ३ फेबुवारी २०२६ कालावधीत डेक्कन परिसरात घडली. याप्रकरणी तरुणाने डेक्कन पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीषा निंबाळकर तपास करीत आहेत.

# पुणे महापालिकेच्या ७५ शाळांचा 'आदर्श शाळा' विकास; ३.१४ कोटींच्या खरेदीला मंजुरी

पुणे: महापालिकेच्या शिक्षण विभागातील ७५ शाळा 'आदर्श शाळा' म्हणून विकसित करण्याच्या पार्श्वभूमीवर तब्बल ३ कोटी १४ लाख ६८ हजार ८०० रुपयांच्या खेळणी व शालेय साहित्यखरेदीला अखेर स्थायी समितीने मंजुरी दिली. मात्र, याच प्रस्तावाला काही दिवसांपूर्वी स्थगिती दिली होती. परंतु, आता अचानक मंजुरी देण्यात आल्याने निर्णय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महापालिकेच्या गतवर्षीच्या अंदाजपत्रकातील निधीतील तरतुदीवरून आदर्श शाळा म्हणून बालवाडीसाठी ३ कोटी १४ लाखांचे साहित्य खरेदीचा प्रस्ताव भांडार विभागाने मंजुरीसाठी ठेवला होता. या



प्रस्तावास दि. ९ एप्रिलला झालेल्या बैठकीत स्थायी समितीने महिनाभरासाठी पुढे ढकलले होते.

शाळांना दोन महिन्यांची उन्हाळी सुटी असणे, तसेच कोणत्या शाळांचा समावेश होणार याबाबत अनिश्चितता असल्याने हा निर्णय घेण्यात आला होता. असे असताना प्रशासनाने तातडीची गरज दाखवत आयुक्तांच्या जुन्या प्रस्तावानुसार पुन्हा विषय मांडला आणि त्यास मंजुरी मिळवली. या खरेदीबाबत प्रशासनाने बालवाडीतील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक खेळणी उपलब्ध करून देण्याचा उद्देश असल्याचे स्पष्ट केले आहे. तरीही, निर्णयातील बदलत्या भूमिकेमुळे पारदर्शकतेबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

समाविष्ट गावांतील शाळांना ई-लर्निंगचा लाभ

महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांमधील ६५ शाळांमध्ये संगणक कक्ष उभारून ई-लर्निंग सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावालाही स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. शिक्षण समितीच्या या प्रस्तावाला अंतिम मान्यता देण्यासाठी तो मुख्य सभेकडे पाठवण्यात आला आहे.

# बाणेरमध्ये धक्कादायक प्रकार; जिवंत महिलेला कागदोपत्री 'मृत' ठरवून जमीन हडपण्याचा प्रयत्न

पुणे । प्रतिनिधी

जमिनीच्या तुकड्यासाठी रक्ताच्या नात्याला हरताळ फासणारा एक संतापजनक प्रकार बाणेर परिसरात उघडकीस आला आहे. एका जिवंत वृद्ध महिलेला चक्क कागदोपत्री 'मृत' ठरवून, तिचा बनावट मृत्यू दाखला तयार करीत जमिनीवर स्वतःचे नाव लावण्याचा धक्कादायक पराक्रम पोटच्या मुलीने आणि तिच्या साथीदारांनी केला आहे.

याप्रकरणी सविता दत्तात्रय सोमवंशी, शैलेश राठोड व दत्तात्रय संभाजीराव शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. मृणालिनी




संजय निकम (वय ५२, रा. पाषाण) यांनी बाणेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृणालिनी यांची आई अद्याप जिवंत असताना सविता दत्तात्रय सोमवंशी, शैलेश राठोड आणि दत्तात्रय शिंदे यांनी संगनमत करून कट रचला. आरोपींनी आईचा खोटा मृत्यू दाखला तयार केला आणि तो खरा असल्याचे भासवून बाणेर येथील तलाठी कार्यालयात सर्व्हे नंबर ३२/१अ/१/२० वेस्ट पोस्टजवळ बाणेर या जमिनीवर वारसनोंदीसाठी सादर केला. या बनावट कागदपत्रांच्या आधारे फिर्यादीच्या आईच्या मालकीच्या प्लॉटवर बनावट फेरफार नोंदवून घेऊन सरकारची आणि आईची [illegible] केली.

# कात्रज घाटात भीषण अपघात! एसटी बस आणि रिक्षाच्या धडकेत एकाचा दुर्दैवी मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

कात्रज घाटातील जुन्या बोगद्याजवळ गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात रिक्षाचालकाचा मृत्यू झाला असून, तीन प्रवासी जखमी झाले आहेत. हा अपघात गुरुवारी सायंकाळी सुमारे सव्वापाच वाजण्याच्या सुमारास आंबेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच १० डीटी २६९७ क्रमांकाची राज्य परिवहन महामंडळाची बस स्वारगेटहून सांगली जिल्ह्यातील विटा येथे जात होती. त्याच वेळी एमएच १२ जीएस ९६९५ क्रमांकाची रिक्षा खेड शिवापूरहून स्वारगेटकडे येत होती. कात्रज घाट बोगदा संपल्यानंतर दुसऱ्या वळणावर दोन्ही वाहनांमध्ये समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात रिक्षाचालक हनुमंत रमेश हंगरगे (४२, रा. बिबवेवाडी) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला,

तर रिक्षामधील तीन प्रवासी राजेश इंगवले (४८), दशरथ निरगुडे (४३) आणि शहाजी शिवदे (४१) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांना १०८ रुग्णवाहिकेद्वारे तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, बस चालक जालिंदर विष्णू शिंदे (५३, रा. खानापूर, जि. सांगली) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येत आहे.

अपघातानंतर दोन्ही वाहने रस्त्याच्या कडेला घेऊन वाहतूक सुरळीत करण्यात आली. याप्रकरणी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

# दौंडमध्ये देशी कट्ट्यासह तरुणाला अटक; पोलिसांची धडक कारवाई

दौंड: दौंड शहर आणि तालुक्यात बेकायदेशीर कट्टे बाळगणाऱ्यांचे प्रमाण वाढल्याचे वृत्त दै. 'पुढारी'ने दोन दिवसांपूर्वीच प्रसिद्ध केले होते. या वृत्ताची दखल घेत दौंड पोलिसांनी धडक कारवाई केली असून, खडकी परिसरातून एकाला देशी कट्टा आणि तीन जिवंत काडतुसांसह रंगेहाथ अटक केली.

मिळालेल्या माहितीनुसार, खडकी (ता. दौंड) येथील शिवाजी महाराज चौक परिसरात वैभव संजय शिंदे हा तरुण संशयास्पद हालचाली करीत असल्याची माहिती पोलिस निरीक्षक गोपाळ पवार यांना गुप्त बातमीदाराकडून मिळाली होती.

या माहितीच्या आधारे दौंड गुन्हे शोध पथकाने सापळा रचून वैभवला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ५३ हजार रुपये किमतीचे एक देशी बनावटीचे पिस्तूल आणि ३ जिवंत काडतुसे मिळून आली. पोलिसांनी सर्व साहित्य जप्त करून त्याला बेड्या ठोकल्या. आरोपी वैभव शिंदे याच्याविरुद्ध भारतीय शस्त्र कायदा कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल, अप्पर पोलिस अधीक्षक गणेश बिरादार आणि उपविभागीय पोलिस अधिकारी बापूराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गोपाळ पवार, पोलिस उपनिरीक्षक रूपेश कदम, नितीन बोराडे, सुभाष राऊत, अमीर शेख, निखिल जाधव, किरण पांढरे, पवन माने, संजय कोठावळे आणि नितीन दोडमिसे यांच्या पथकाने केली. या घटनेचा तपास दौंड पोलिस करीत असून, या अवैध शस्त्रास्त्रांचे धागेदोरे कोणापर्यंत पोहोचतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

दौंड परिसरातील अवैध शस्त्रास्त्रांच्या वाढत्या धोक्याबाबत दै. 'पुढारी'ने दोन दिवसांपूर्वीच सविस्तर वृत्त प्रसिद्ध केले होते. अनेक तरुणांच्या हाती 'कट्टे' पोहोचले असून, यामुळे शांतता भंग होऊ शकते, असा इशारा या वृत्तातून देण्यात आला होता. पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे मांडलेली वस्तुस्थिती अधोरेखित झाली आहे.

# जिवंत महिलेला मृत दाखवून जमिनीवर डल्ला; कोट्यवधींच्या प्लॉट हडपण्याचा बनाव उघड

पुणे । प्रतिनिधी

जिवंत महिलेला कागदोपत्री मृत दाखवून त्यांची जमीन हडपण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यासाठी बनावट कागदपत्रांद्वारे सरकारी नोंदीत बदल केले होते. मात्र, कुटुंबीय वेळेत सतर्क झाल्यामुळे हा मोठा गैरप्रकार उघडकीस आला. याप्रकरणी मृणालिनी संजय निकम (५२, रा. पाषाण) यांनी बाणेर पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार सविता दत्तात्रय सोमवंशी,

शैलेश राठोड आणि दत्तात्रय संभाजीराव शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २८ फेब्रुवारी २०२४ ते १७ एप्रिल २०२६ दरम्यान घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार निकम यांच्या वडिलांनी १९८८ मध्ये वेस्ट पोर्ट, बाणेरजवळ सुमारे ४३० चौरस मीटर जमीन त्यांच्या आईच्या नावावर खरेदी केली होती.

तक्रारदार यांच्या आईने वयोमान आणि आजारपणामुळे या जागेची पॉवर ऑफ अटर्नी तक्रारदारांच्या नावावर केली होती. तक्रारदार




हा प्लॉट विकसित करणार होते. यासाठी एप्रिल २०२६ मध्ये विकासाचा करारही केला होता. दरम्यान, जमिनीशी संबंधित माहिती सरकारी पोर्टलवर तपासली असता, जमिनीच्या नोंदीमध्ये दुसऱ्याच एका महिलेचे नाव नोंदविल्याचे आढळले.

त्यामुळे तक्रारदारांनी कर्वेनगर येथील अप्पर सर्कल कार्यालयात जाऊन चौकशी केल्यानंतर जमिनीवर कब्जा करण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर केल्याचे उघड झाले. सविता सोमवंशी यांनी ई-हक्क प्रणालीमध्ये फेरफार करून जमीन आपल्या नावावर करण्यासाठी अर्ज केला होता. तक्रारदार यांची आई जिवंत असताना मयत असल्याचे दाखवून बनावट मृत्यू दाखला तयार करण्यात आला.


वारस प्रमाणपत्र आणि इतर कागदपत्रेही बनावट तयार करून शैलेश राठोडमार्फत तहसील कार्यालयात जमिनीच्या नोंदीत फेरफार करून मालकीच्या नोंदीत बदल केला. शिवाय वारस म्हणून स्वतःचे नाव नोंदविण्याची प्रक्रिया पूर्ण केली. दत्तात्रय शिंदे यांनी तक्रारदारांच्या आईच्या नावाने बनावट कुलमुखत्यारपत्र तयार करून फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद केले असून, तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबासाहेब झरेकर करत आहेत.

# सोसायटीचा निष्काळजीपणा चिमुकलीच्या जीवावर; घसरगुंडी पडून बालिकेचा दुर्दैवी अंत

पुणे । प्रतिनिधी

सोसायटीच्या आवारात बसविलेली लोखंडी घसरगुंडी डोक्यात पडून बालिकेचा मृत्यू झाल्याची घटना हडपसरमधील मगरपट्टा भागात घडली. दुर्घटनेस जबाबदार ठरल्याप्रकरणी हडपसर पोलिसांकडून सोसायटीतील अध्यक्षांसह अन्य पदाधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. अनिका नवनाथ देवीकर (साडेचार वर्ष) असे मृत्युमुखी पडलेल्या बालिकेचे नाव आहे.

याप्रकरणी तिचे वडील नवनाथ पांडुरंग देवीकर (३४, रा. वेदविहार सोसायटी, नोबल हॉस्पिटलजवळ, मगरपट्टा,



हडपसर) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सोसायटीतील अध्यक्ष, तसेच पदाधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ एप्रिल रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास अनिका सोसायटीच्या आवारात खेळत होती. त्यावेळी अचानक लोखंडी घसरगुंडी पडून अनिकाच्या डोके, चेहरा, मानेला गंभीर दुखापत झाली. बेशुद्धावस्थेतील अनिकाला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. सोसायटीकडून आवारात लहान मुलांसाठी खेळणी बसविण्यात आली आहे, याच आवारातील घसरगुंडी व्यवस्थित बसविली नव्हती. ती काढून टाकण्याबाबत अनिकाचे वडील नवनाथ यांनी सोसायटीतील पदाधिकाऱ्यांना सांगितले होते. याबाबत वारंवार तक्रार दिली होती. मात्र, सोसायटीतील पदाधिकाऱ्यांनी योग्य ती कार्यवाही न केल्याने दुर्घटना घडल्याचे अनिकाचे वडील नवनाथ देवीकर यांनी फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक साने तपास करीत आहेत.